बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.४ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक६ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## प्रभू रामाचा इतिहास खोटा!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

तमिळनाडूचा सत्ताधारी पक्ष द्रमुकच्या मंत्र्याकडून वादग्रस्त विधान करण्यात आले आहे. प्रभू रामाच्या अस्तित्वाचा कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही, असे विधान तमिळनाडूचे मंत्री एसएस शिवशंकर यांनी शुक्रवारी केले. चेन्नईपासून नजीक असलेल्या अरीयलूर जिल्ह्यात चोल साम्राज्याचे पहिले राजे राजेंद्र यांच्या जयंतीनिमित्त एका कार्यक्रमात बोलत असताना त्यांनी हे विधान केले. राजेंद्र चोलन यांनी तलाव बांधल, मंदिरांचे निर्माण केले. चोल राजांचे नाव असलेले शिलालेख आणि हस्तलिखित दस्ताऐवज मिळालेले आहेत.



# आम्ही आता आशा सोडली!!

## निर्णय : आरक्षण प्रश्नी मनोज जरांगे पाटील माघार घेणार?

**मी तुमच्यासाठी खंबीर**

माझी समाजाकडे काहीही अपेक्षा नाही. तुमचे पोरं मोठे करण्यासाठी मी जीव हातावर घेतला आहे. मी शेवटच्या घटकेपर्यंत मराठा समाजाला कधीही सोडणार नाही, असं मनोज जरांगे काहीच दिवसांपूर्वी म्हणाले होते.

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या वर्षभरापासून मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन आणि उपोषण केले आहे. प्रत्येकवेळी तारीख पे तारीख देऊन सरकारनेही मराठा आरक्षणाबाबत ठोस उपाय केलेला नाही. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना १० टक्के आरक्षण दिले असले तरीही हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मराठा समाजाच्या सर्वच मागण्या मान्य झाल्याचंही म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे आंदोलन काळात मराठा समाजातील मुलांवर लावलेले गुन्हे मागे घेणे, सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करणे आदी मागण्याही प्रलंबित आहेत. त्यामुळे मनोज जरांगे पाटील आता आंदोलन मागे घेतील अशी दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. या चर्चेवर मनोज जरांगे पाटलांनी आता मौन सोडलं आहे.

गुन्हे मागे घेण्यासंदर्भात मनोज जरांगे पाटलांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, गुन्हे मागे घेण्याबाबत शिष्टमंडळाने काही सांगितलं नाही. मी त्यांना सांगितलं आहे की सरसकट गुन्हे मागे घेतले पाहिजेत. यासाठी त्यांचा आमदारही साक्षीदार आहे. मीडियासमोर मी विचारलं होतं. सरसकट गुन्हे मागे घेण्याची मागणी आहे. आजपर्यंतचे सर्व गुन्हे माफ करायचे. कारण आमची पोरं त्यात नाहीत, विनाकारण त्यांना गुंतवण्यात आलं आहे. ही पोरं मुंबई पुण्यात शिकायला गेली आहेत, तरीही त्यांना यात गुंतवलं आहे. राजकीय द्वेषापोटी त्यांना गुंतवलं आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. ते पुढे म्हणाले, स्थानिक जिल्ह्यातील आमदार जबाबदार आहेत. त्यांनीच आगीत तेल ओतण्याचं काम केलं. आम्ही घाबरलो पाहिजे यासाठीच त्यांनी गुन्हे दाखल केले होते.

### दरेकरांच्या मदतीने फडवीसांचं अभियान

नांदेड, लातूर, बीड, जालना, नगर, पुणे एकही मुलगा आंदोलनातून मागे सरकला नाही. माझ्यापर्यंत आला नाही. आरक्षण देण्यासंदर्भात त्यांनी तारीख वाढवली किंवा नाही वाढवली तरी आम्ही आता आशा सोडली. आरक्षण देत नाहीत, सगेसोयऱ्याची अंमलबजावणी करत नाहीत, धनगर बांधवांना सांगितलं होतं की १० टक्के आरक्षण देऊ. त्यांनाही घेऊ देत नाहीत. ओबीसीला धोका दाखवायला लागले आहेत. त्यांचे अभियान सुरू आहेत. फडणवीसांनी दरेकरांच्या मदतीने सुरु केलेले हे अभियान आहेत, अशी टीकाही मनोज जरांगे पाटलांनी केली आहे.

## महावितरण कामाचे श्रेय घेने बंद करा !

### बोंबला : आ.नमिताने रेघोट्या मारू नयेत?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघाच्या विद्यमान आमदार यांना कोणत्याही कामाचे श्रेय घेण्यात पटाईत आहेत भलेही काम एखादे काम दुसऱ्या नेतृत्वाच्या प्रयत्नाने झालेले असेल पन त्या कामाचे श्रेय मात्र केजच्या विद्यमान आमदार व त्यांचे सासरे यांनाच मिळायला हवे असे केजच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांची श्रेय लाटण्यासाठी दीवसरात्र काम करत असतात भलेही ते काम निकृष्ट भोगस दर्जाचे झालेले असो किंवा आमदारा फंडातील असो पन श्रेय विद्यमान आमदार यांनाच मिळायला हवे व पाच



वर्षांच्या कालावधीत विकास न करता आमदारा नमीता मुंदडा व भुरटे सासरे बुवा यांचे पाच वर्षे फक्त जनतेची दिशाभूल करण्यात ,भोगस निकृष्ट दर्जाचे कामाचे उद्घाटन श्रेय घेण्यात व टक्केवारी घेण्यात पाच वर्षे आमदारा नमीता मुंदडा यांचे गेले आहेत व मतदार संघात विकास तर करता आला नाहीच पण मतदार संघाची वाट लावण्यात विद्यमान आमदार नमीता मुंदडा पाच वर्षे प्रयत्नशील राहील्या आहेत अशाच घटना महावितरण कंपनीच्या माध्यमातून आमदारा नमीता यांनी घडवल्या आहेत मतदार संघात साधा सिंगल फेज डीपी प्रशासनाने मंजुर केला तरी तो डीपी विद्यमान आमदार यांनी दीला आहे असे स्वता भुरट्या आमदारा म्हणतात तरी आमदारा नमीता यांची महावितरण कंपनीची जहागीर आहे का

पान २ वर...

## अपघातात एक ठार तर एकजण जखमी

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील तलवाडा हद्दीतील भोगलगाव येथील सुधीर बांगर, हे दुचाकी वर आपल्या सासरवाडी माजरसुबा येथील हिंगणी गावा कडे जात असताना दिं.३/ रोजी संध्याकाळी सहा वाजता धुळे सोलापूर महामार्गावरील बायपास बीड येथील सम्राट चौकात अंबाजोगाई कडुन भरधाव वेगाने येणाऱ्या पिकपच्या धडकेने दुचाकी स्वार सुधीर बांगर जागीच ठार झाला तर एक जण जखमी झाल्याचे माहिती समोर येत आहे. या दुदैवी अपघाताने हळहळ व्यक्त होत आहे, पिकप ग्रामीण पोलीस स्टेशन बीड यांच्या ताब्यात घेण्यात आले आहे.

## आष्टीत बनावट मतदारांची पडताळणी

### तत्परता : धोंडेंच्या तक्रारीची निवडणूक आयोगाकडून दखल

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टीत बनावट मतदार नाव नोंदणी होत असल्याची तक्रार माजी आ. भिमराव धोंडे यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती. याची आयोगाने गांभीर्याने दखल घेऊन नव्याने नोंद झालेल्या मतदारांपैकी संशयित बनावट मतदारांची पडताळणी सुरू केली आहे.



माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टीत बोगस मतदार नोंदणीबाबत केलेल्या तक्रारीची माहिती व विविध कामांचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालयास भेट दिली, वेगवेगळ्या विभागात जाऊन कामाची पाहणी केली. धोंडे यांनी चार दिवसांपूर्वी बनावट मतदार नाव नोंदणीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती त्याबाबत तहसिलदार प्रमोद गायकवाड यांना भेटून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आपल्या तक्रारीची निवडणूक आयोगाकडून दखल घेण्यात आली असून तक्रारीनुसार संशयित वाटणाऱ्या व नव्याने नोंद झालेल्या मतदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये काही संशयास्पद नांवे आढळली आहेत. सर्व मतदान केंद्र स्तरीय अधिकारी ( बीएलओ) यांनी या बाबींची खातरजमा

पान २ वर...

## बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याचे काम

### डॉ.योगेश क्षीरसागर: टेंडर प्रक्रिया होणार गतीने

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या बीड शहराजवळील बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टेंडर प्रक्रिया गतीने पूर्णत्वास जात असून लवकरच काम सुरू होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाकापर्यंत हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाने मंजूर झालेला आहे. या मार्गावर बिंदुसरा नदीवर पुल आहे. त्याठिकाणी पुल कम बंधारा उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. यासंदर्भात माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी शासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार शासनाने पुल कम बंधारा मंजूर केला होता. परंतु पुढे प्रशासकीय पातळीवर संथ गतीने प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे डॉ.योगेश

पान २ वर...

## एमपीआयडी प्रस्तावास मान्यता मिळणार

### राजेंद्र मस्के : आरोपी अटकेसाठी फडणवीसांची भेट घेणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव रकमेच्या गैरव्यवहार गुन्ह्यातील ठेवीदारांची वित्तीय संस्थामधील हित संबंधांचे संरक्षण अधिनियम एमआयडी १९९९ अंतर्गत जिल्हा प्रशासनामार्फत प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. १५ जुलै दरम्यान राज्याचे उप मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन सदरील प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन अधिसूचनेत प्रसिद्धी द्यावी अशी मागणी ठेवीदारांच्या वतीने केली असून, हा प्रस्ताव मान्यता देण्यासाठी मंत्रालय स्तरावर गृह विभागात तातडीची कार्यवाही चालू आहे. लवकरच या प्रस्तावास राज्य सरकार मान्यता देणार आहे. आवश्यकता वाटल्यास जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदार



शिष्ट मंडळाची ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देणार अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड बँकेचे अध्यक्षा अनिता बबन शिंदे पती बबन विश्वनाथ शिंदे,अध्यक्षांचे कुटुंबीय, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने ठेवीदारांच्या सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. या विरोधात पो. स्टे. शिवाजीनगर गु.र.न. ३६०/ २०२३ कलम ४२०,४०६,४०९,३४,१२० (ब) भा.द.वि, सह कलम ३,४ एम आय डी १९९९ प्रमाणे असे तीन गुन्हे बीड पोलिसात व एक गुन्हा धाराशिव जिल्ह्यात दाखल आहे.गुन्ह्यातील आरोपींची स्थावर/ जंगम मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय आस्थापने मधील) हित संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत तपशीलवार प्रस्ताव मा. अप्पर पोलीस महासंचालक ( आ. गु. शा.) महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून मा. प्रधान सचिव विशेष गृह विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर आहे. सदरील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गुन्ह्यातील आरोपी व संबंधातील व्यक्तींची मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करणे करिता महसूल विभागातील उप

पान २ वर...

## सरपंच अपात्र प्रकारणी प्रतिवादीची मांडली बाजू





सिरसाळ/पुण्यभूमी प्रतिनिधी

दोन दिवसापुर्वीच परळी तालुक्यातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या सिरसाळा ग्रामपंचायतचे सरपंच अन्वर निसार पट्टेदार यांचे सरपंच पद विभागीय आयुक्त यांच्या दालना मध्ये अपात्र ठरले . या प्रकरणात प्रतिवादी सय्यद गुफूर जामीन यांच्या बाजूने उच्च न्यायालयाचे ड . रामराजे कवडे व ड . सतिश काळे यांनी काम पाहिले, वयाच्या मुद्द्यावरून शिरसाळा सरपंच अन्वर निसार पट्टेदार यांचे पद तत्कालीन बीड कलेक्टर दीपा मुधोळ यांनी दिनांक २७ जून रोजी अपात्र ठरवले होते .कलेक्टरांच्या निर्णयाला आव्हान देत सरपंच

पान २ वर...

**अ‍ॅड.सर्जेराव तांदळे** | **१० टक्के आरक्षणातून संधी**

# म्हणून मुस्लीम समाजाला फायदा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारमुळे ईडब्ल्युएसमधुन मुस्लीम समाजाला पोलीस भरतीसह इतर शासकीय सेवेत संधी मिळत आहेत. आर्थिक निकषावर आधारित दहा टक्के आरक्षण दिल्याचा फायदा समाजाच्या विकासासाठी होवू लागल्याचे प्रतिपादन भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी न.प.उपाध्यक्ष अ‍ॅड.सर्जेराव तांदळे यांनी केले.

बीड शहरातील चंपावती क्रिडा मंडळावर आयोजीत केलेल्या छोटेखानी सत्कार समारंभात अ‍ॅड.तांदळे बोलत होते. अ‍ॅड.तांदळे पुढे म्हणाले की, राज्यात नुकतीच गृहविभागाच्या वतीने पोलीस भरती प्रक्रिया पार पडली. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक तथा गुणवत्तेच्या आधारावर झाली असुन या भरती प्रक्रियेत



बीड जिल्ह्यातील जवळपास १९ मुस्लीम विद्यार्थी ईडब्ल्युएस वर्गातून पात्र ठरले आहेत. आत्तापर्यंत पार पडलेल्या भरती प्रक्रियेमधील हा एक मोठा उच्चांग असुन बीडप्रमाणेच इतर जिल्ह्यातही ही संख्या लक्षणीय असल्याचे त्यांनी सांगितले. मुस्लीम समाजाने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येवून गुणवत्तापुर्ण शिक्षण घ्यावे आणि आपली प्रगती करावी. आज मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. परंतू गुणवत्तुपर्ण शिक्षण घेतल्यास त्यांची प्रगती कोणीही रोखू शकत नाही. त्याचबरोबर मुस्लीम समाजातील मुलांनी जास्तीत जास्त ईडब्ल्युएस प्रमाणपत्र काढावेत असे आवाहन अ‍ॅड.तांदळे यांनी केले. अ‍ॅड.तांदळे यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषद सदस्या आ.पंकजाताई मुंडे, माजी खा.प्रितमताई मुंडे यांचे आभार मानले. याप्रसंगी अ‍ॅड.बाळासाहेब राख, गोपाळ धांडे, प्रा.सी.आर.पटेल, इब्राहीम खान, कबीर सौदागर, डॉ.आबासाहेब बागलाने, विनोद गर्जे, संदीप गायकवाड, अजिंक्य पांडव आदि उपस्थित होते.

## केजमध्ये पडू लागले आमदारकीचे स्वप्न!

### सवाल : तेंव्हा संगीता ठोंबरे कुठ होत्या!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्याच्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांनी २०१९ चा पीकविमा मंजुर असुन केज तालुक्याला मिळाला नव्हता मग २०१९ पीकविमा गेला कुठे असा प्रश्न उपस्थित होतो आहे का माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी तालुक्याला मिळु दीला नाही का गायब केला का स्वताची खळगी भरली असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे कारण इतर तालुक्याला जिल्ह्याला २०१९ पीक विमा मिळाला मग २०१९ मध्ये केज तालुक्याला पीक विमा मिळाला का नाही २०१९ च्या विद्यमान आमदार संगीता ठोंबरे यांनी केज तालुक्याला २०१९ चा पीकविमा मिळवुन का दीला नाही जर २०१९ मध्ये साधा केज तालुक्याला पीक विमा मंजुर असुन शेतकऱ्यांना मिळुन देता आला तर माजी आमदार संगिता ठोंबरे येणाऱ्या काळात केज तालुक्याचा विकास



करतील कशावरून सिध्द करायचे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तसेच इतर जिल्ह्यांचे खासदार, तालुक्याचे आमदारा यांनी रस्त्यावर उतरून त्यांनी त्यांच्या तालुक्याला पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करून दीले परंतु २०१९ च्या विद्यमान

पान २ वर...

# ‘जात’कथा

रंग/ रूप/ उंची/ जन्मस्थळ इत्यादींप्रमाणे जे मिळवण्यात कोणतेही स्वकर्तृत्व नसते त्या ‘जात’ या घटकाचे भांडवल किती करावे आणि हे भांडवल ज्यांकडे नाही त्यांची किती उपेक्षा करावी?’’ हा मुद्दा हाताळताना विवेक हवाच, असे मत ‘जातीचा विवेक आणि विवेकाची जात!’ (१ ऑगस्ट) या संपादकीयातून मांडला गेला; त्याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती/ जमातींचे उपवर्गीकरण वैध ठरवणारा निकाल दिला, हा निव्वळ योगायोग. असे योगायोग आणखीही शोधता येतील. उदाहरणार्थ अण्णा भाऊ साठे जयंतीच्या दिवशीच हा निकाल आला. किंवा मंडल आयोग शिफारशींच्या स्वीकाराचा ७ ऑगस्ट हा वर्धापन दिन आम्ही साजरा करणार असे जाहीर झाल्याच्या दिवशीच ताजा निकाल आला, वगैरे. पण अशा योगायोगांत रमण्यापेक्षा या निकालाचे वर्तमान आणि संभाव्य पडसाद अधिक महत्त्वाचे. ते तपासण्यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन अशासाठी की, केवळ जन्माने मिळणाऱ्या जातीचे सांस्कृतिक भांडवल ज्यांकडे नाही त्यांची उपेक्षा होऊ नये, ही कळकळ सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिलेल्या या निकालात दिसते. अनुसूचित जातींपैकी काही जातिसमूह अधिक मागास आहेत, हे वास्तव स्वीकारून त्या जातींसाठी आरक्षणात प्राधान्य ठेवण्याची मुभा राज्ययंत्रणेला आजवर नव्हती. ती ताज्या निकालाने दिली. हा निकाल सात जणांच्या घटनापीठाचा. त्यापैकी एक मत विरोधी आहे. पण उर्वरित सहा न्यायमूर्तींनी पाच निरनिराळी निकालपत्रे दिली आहेत. हे या निकालाचे निराळेपण.त्या निराळेपणामुळेच या निकालात एक मूलभूत दुभंग राहिल्याच्या टीकेला निमंत्रण मिळेल. या दुभंगाला सांधणारा विचार न होणे हे येत्या काही काळात निकालाच्या अंमलबजावणीला छळणारे ठरेल. ते कसे, हे समजून घेण्यासाठी आधी थोडा तपशील देणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती–जमातींपैकी अधिक मागासांना सरकारी सेवांमध्ये अधिक योग्य प्रतिनिधित्व मिळावे; त्यासाठी उपवर्गीकरण करण्यास हरकत नाही, अशी बाजू घेणारा निकाल सहा न्यायमूर्ती देतात. हे करणार कसे? याची दोन उत्तरे पाच निकालपत्रांत सापडतात. त्यांपैकी चार न्यायमूर्ती ‘क्रीमीलेयर’ या संकल्पनेचा उल्लेख करतात. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. मनोज मिश्रा यांनी मिळून दिलेल्या निकालपत्रात मात्र क्रीमीलेयरचा उल्लेख नाही. चंद्रचूड व मिश्रांचे निकालपत्र हे इंद्रा साहनी प्रकरणातील निकालामधली ‘मागासपणाचा व्यवच्छेदक बोध’ (इंटेलिजिबल डिफन्शिया) ही संकल्पना उद्धृत करते आणि ‘‘एखादी जात अथवा समूह मागास असल्याकारणानेच त्या समूहाला (सरकारी नोकऱ्यांत) पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही, हे राज्ययंत्रणेने सिद्ध केले पाहिजे’’ अशी स्पष्ट अट घालते. हे विधान नि:संदिग्ध– म्हणून अभिनंदनास्पद. त्याउलट, ‘क्रीमीलेयर’ ही संकल्पना वापरणाऱ्या निकालपत्रांमध्ये मात्र ‘‘क्रीमीलेयरचे तत्त्व ज्या प्रकारे इतर मागासवर्गीयांना (ओबीसींना) लावले जाते, त्यापेक्षा निराळ्या प्रकारानेही ते अनुसूचित जाती/ जमातींनाही लागू करता येऊ शकेल’’ एवढेच म्हटले असल्याने मोघमपणा अधिक दिसतो. पण खरा फरक हा स्पष्टता आणि मोघमपणा एवढ्यापुरता नाही. ही दोन संकल्पनांमधली तफावत आहे. ‘जातीचा/ समूहाचा मागासपणा’ आणि ‘क्रीमीलेयर’ या दोन्ही संकल्पना आरक्षणाच्या न्याय्यतेला उपकारक आहेत हे खरे. पण त्यांमधले साम्य एवढ्यावरच संपते. ‘समूहाचा मागासपणा’मध्ये त्या जातीचे– त्या राज्यातले सगळे लोक येतात. ही समावेशक संकल्पना झाली. मात्र ‘क्रीमीलेयर’ ही वगळणारी– चाळणी लावणारी संकल्पना आहे. एखाद्या ओबीसी उमेदवाराचे कुटुंबीय जर घटनात्मक पदांवर, जिल्हाधिकारी आदी पदांवर, सेनादलांतले कुटुंबीय लष्करातील कर्नल वा त्याहून वरच्या पदांवर, राजपत्रित अधिकारी या पदावर असतील किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांहून जास्त असेल, तर ‘क्रीमीलेयर’ तत्त्वानुसार अशा ओबीसी उमेदवारांना आरक्षण मिळत नाही. या चाळणीचा सारा रोख कुटुंब या घटकावर आहे. इथे खरी मेख आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना मिळणारे आरक्षण हे आजवर समूह हा घटक मानणारे होते. कारण राष्ट्रपतींच्या अखत्यारीतील या दोन्ही अनुसूचींचा पाया हा ‘सामाजिक मागासलेपणा’ असाच होता आणि आहे. अनुसूचित जातींबद्दल ‘सामाजिक मागासलेपणा’चे तत्त्व नाकारा, असे कोणत्याही न्यायालयाने कधीही म्हटलेले नाही; कारण जातिव्यवस्थेतून येणारा सामाजिक मागासलेपणा हे आपल्या देशाचे वास्तव आहे. आजदेखील अनुसूचित जाती/ जमातींतल्या गुणवंतांचे कौतुक ‘त्यांच्यातला/ त्यांच्यातली असूनसुद्धा हुशार’ अशा सुरात होते, तेव्हा नकळतपणे सामाजिक मागासलेपणाची कबुली मिळत असते आणि त्या मागासपणाचा आधार जात वा समूह हाच आहे यालाही बळकटी मिळत असते. पाऊणशे वर्षांपूर्वी जेव्हा संविधानसभेत आरक्षणाची चर्चा झाली, तेव्हा या ‘सामाजिक मागासलेपणा’ला अस्पृश्यतेच्या वास्तवाचीही पार्श्वभूमी होती. ‘या अनुसूचीपैकी कोणत्या समूहाला अस्पृश्यतेची झळ अधिक बसते आणि कोणाला कमी, याच्या चर्चेत अर्थ नाही’ अशा अर्थाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आवाहन संविधानसभेला पटले होते. पण त्या चर्चांनंतर अर्धशतकाहून अधिक काळाने पुन्हा अनुसूचित जातींमधल्या तुलनेने प्रगत आणि मागास समूहांमध्ये फरक करण्याचा प्रश्न निर्माण झाला, तो आरक्षणाचे लाभ कोणाला अधिक मिळाले याच्या आधाराने.हे संबंधित अनेक परींचे असू शकतात. यात आरक्षणाचे पूर्वापार लाभार्थी ठरलेले आणि त्यापासून तुलनेने वंचित राहिलेले हा एक गट. अनुसूचित जाती वा जमातींपैकी विशिष्ट समूहांचा वापर आपापल्या राजकारणासाठी करून घेऊ पाहणारे राज्याराज्यांमधील सत्ताधारी हा दुसरा गट. तर तिसरा गट सामाजिक न्यायाच्या हितशत्रूंचा– यात ‘नॉन क्रीमीलेयर’ प्रमाणपत्र देण्या वा घेण्यासाठी वाट्टेल त्या तडजोडी करणारे जसे येतात, तसेच भारतीय संविधानाने मान्य केलेल्या सामाजिक आरक्षणाच्या संकल्पनेबद्दल जाणूनबुजून अनभिज्ञ राहणारे तथाकथित उच्चवर्णीयही येतात. समाजाचे महावस्त्र अनेक ताण्याबाण्यांनी विणलेले असणार, त्यातल्या आडव्याउभ्या धाग्यांमध्ये फरकही असणार हे वैश्विक सत्य; पण दुसऱ्याला कमकुवत केल्याशिवाय आपल्याला स्थैर्य नाही असे या धाग्यांनीच ठरवले तर महावस्त्रालाही ठिगळे लावावी लागतात. स्वातंत्र्योत्तर काळात ‘आम्ही जात मानत नाही’ असे उच्चरवाने सांगणाऱ्या भारतीयांचा व्यवहार मात्र त्याउलट राहिल्याने, आपली कथा आता अनुसूचित जाती व जमातींमध्येच पोटभेद करण्यापर्यंत आली आहे. न्यायालयाने त्यांच्यापुढील संविधानविषयक प्रश्न सोडवण्याचे काम केले, हा या कथेतला महत्त्वाचा टप्पा. इथून पुढे काय होणार, ही भयकथा वा सूडकथा तर होणार नाही ना, यावर विद्यामान समाजाच्या ‘जात’ककथेचे तात्पर्य ठरणार आहे.

# यात्रा भक्तीसाठी की दहशतीसाठी?



महाराष्ट्रात जशी वारी तशीच उत्तर भारतात कावड यात्रा. इथे विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ, तर तिथे ‘जय भोले की’ हा जप इथे माऊली आणि तिथे भोले. पण गेल्या काही वर्षांत हे भोले वारंवार उग्र रूप धारण करताना, भाररस्त्यात तांडव करताना दिसू लागले. दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, हरियाणा राजस्थानमध्ये रस्तोरस्ती कावड यात्रींची दहशत पसरू लागली. आज परिस्थिती अशी आहे की रस्त्यांवर यात्राकाळात दहशतीचं सावट असतं. गाड्या फोडल्या जाणं, वाहनचालकांना बेदम मारहाण होणं सामान्य घटना ठरू लागतात. यात्रेकरूंच्या बाजूने जाताना साधा हॉर्नही वाजवणं महागात पडतं. या काळात दंगलसदृश वातावरण असणारंच अशी खूणगाठ रहिवाशांनी बांधलेली असते. कावड यात्रेत कावडीएवढ्याच सर्रास हॉकीस्टिक आणि बेसबॉल बॅट दिसू लागल्या आहेत. आपण काहीही केलं, तरीही पोलीस किंवा कोणतीही यंत्रणा आपलं काहीही बिघडवणार नाही, असं कावड यात्रींना का वाटतं?

यात्रा हा केवळ शरीराने नव्हे, तर मनानेही आपल्या आराध्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न. वाटेत फारतर भजन, कीर्तन होणं अपेक्षित असतं. पण कावड यात्रेत काय दिसतं? ठणाणा हॉर्न वाजवत, इंजिनचे कर्कश आवाज काढत, ट्रिपल सीट, हेल्मेट न घालता निघालेल्या मोटारसायकलस्वारांचा जत्था. तोंडी जय भोले की ही घोषणा आणि हाती असलेले भगवे झेंडे वगळले तर हे जत्थे धार्मिक भावाने निघालेले असावेत असं अजिबात वाटत नाही. आमच्या वाटेत याल तर खैर नाही, हा इशाराच त्यांच्या वर्तनात दिसतो.

कावड यात्रेची मूळ संकल्पना अशी की गंगोत्री, नीलकंठ, ऋषिकेश, गोमुख येथील घाटांवरून गंगेचं पाणी कावडीत भरून घ्यायचं आणि वाटेत येणाऱ्या महत्त्वाच्या मंदिरांत कावडीतून जलाभिषेक करत चालत आपापल्या घरी जायचं. ६०–७० ते १००–१५० किलोमीटर किंवा त्याहूनही जास्त अंतर हे कावडिये दरवर्षी कापतात. या यात्रेची एक विशिष्ट संस्कृती आहे आणि त्याभोवती अर्थकारणही विणलं गेलं आहे. अनेकदा यात्रा मुस्लीमबहुल वस्त्यांतून जातात. दरवर्षी या वस्त्यांत त्यांच्या खाण्या–पिण्याच्या गरजा, हे मुस्लीम बांधवच भागवत. यंदा मात्र फळांच्या आणि अन्य खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर मालकाचे पूर्ण नाव लिहिण्याचा फतवा एका पोलीस ठाण्याने काढला. कारण काय, तर यात्रा भ्रष्ट होऊ नये म्हणून. यामागचा हेतू वेगळा सांगण्याची गरज नव्हतीच. पुढे संपूर्ण उत्तर प्रदेश आणि पाठोपाठ उत्तराखंडमध्येही हा ‘नियम’ लागू करण्यात आला. हा हिंदू– मुस्लिमांत फूट पाडण्याचा, मुस्लिमांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न असल्याची टीका देशभरातून झाली. नंतर न्यायालयाच्या आदेशामुळे हा फतवा मागे घ्यावा लागला, हा भाग वेगळा. पण यातून या दोन्ही राज्यांतील सरकारांचे हेतू स्पष्ट झालेच. एवढे झाल्यानंतरही हरिद्वारमध्ये यात्रा मार्गातली मुस्लिमांची धार्मिक स्थळं पडदे लावून झाकण्यात आली. या कृत्याची जबाबदारी घेण्यास कोणतीही यंत्रणा वा संस्था पुढे आली नाही. त्याची छायाचित्र व्हायरल झाल्यानंतर पडदे काढण्यात आले. आमच्या धार्मिक स्थळांच्या केवळ दर्शनाने यात्रेचं पावित्र्य भंग होणार होतं का, असा प्रश्न तिथल्या मुस्लीम समुदायाला पडला.

उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील घटना– मुरादनगर परिसरात यात्रेकरूंच्या आणि समान्य रहिवाशांच्या वाहनांची प्रचंड गर्दी होती. त्यातच कावड घेऊन पायी निघालेलेही होते. आकिब अहमद नावाचा तरुण आपल्या नातेवाईकांना मेरठला सोडण्यासाठी चारचाकी वाहनातून निघाला होता. त्याच्या कारचा धक्का यात्रेकरूंपैकी कोणाच्या तरी बाइकला लागला, असा यात्रेकरूंचा दावा आहे. आपल्याला असं काही झाल्याचं आठवत नाही, असं आकिबचं म्हणणं. तिथून पुढे दिल्ली–मेरठ हायवेवरच्या टोल नाक्यापर्यंत कावडियांनी त्याचा पाठलाग केला. टोलवर अनेक कावडिये रस्ता अडवून उभे होते. त्यांनी आकिबला अडवलं. त्याचं नाव विचारलं. गाडीतून बाहेर खेचलं आणि हॉकीस्टिक व काठ्यांनी बेदम मारलं. त्याच्या मानेवर चाकूने वार केले. गाडी पूर्णपणे फोडून टाकली.

मुजफ्फर नगरमध्ये एका कारचा कावडीला धक्का लागल्याचा दावा करत मालकाला मारहाण करण्यात आली. गाडी फोडण्यात आली. पोलीस घटनास्थळी पोहोचले तेव्हा कळलं की कावड फुटली नव्हती. केवळ धक्का लागला म्हणून एवढं आकांडतांडव?

रुरकीमध्ये एक ई–रिक्षा चालक कावडियांच्या गर्दीतून वाट काढत प्रवाशाला बसविण्याचा प्रयत्न करत होता. आमच्या जवळून का गेला, या रागातून कावडियांनी त्याला क्रूरपणे मारहाण केली. रिक्षा उलटवली आणि तोडफोड केली. पोलिसांच्या समोरही हे तथाकथित भोले गाडी वर काठ्यांनी प्रहार करत असल्याच्या चित्रफिती प्रसारित झाल्या.मुजफ्फर नगर हायवेवरच्या एका पेट्रोल पंपावर काही कावडिये बसले होते. ते आंबे खाऊन बाठा तिथेच फेकत होते. काहीजण विड्या ओढत होते. पंपावरील कर्मचाऱ्याने त्यांना इथे कचरा टाकू नका. विडी ओढल्याने अपघात होऊ शकतो, म्हणून दटावलं. तर शेकडो कावडिये त्याच्यावर तुटून पडले. त्याला रुग्णालयात दाखल करावं लागलं.कावडियांनी ना शाळेची बस सोडली ना पोलिसांचं वाहन. हरियाणाच्या फतेहाबाद जिल्ह्यात कावडीला धक्का लागला म्हणून शाळेची बस थांबवली गेली. मुलांना खाली उतरवून त्यांच्या देखत मोठाले दगड फेकून बसच्या काचा फोडण्यात आल्या. लाठ्या–काठ्यांनी बसची नासधूस केली गेली.वर्षानुवर्षांपासून उत्तर भारतातल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेली, हिंदू– मुस्लीम बंधुतेचे दर्शन घडवणारी कावड यात्रा आज विकृत आनंदाचं, झुंडशाहीचं, हिंसाचाराचं, द्वेशाचं प्रतीक ठरू लागली आहे. आपली संख्या मोठी आहे म्हणजे आपल्याला कोणी काही करणार नाही, अशी खात्री हे त्यामागचं कारण आहे. सरकार आपल्या बाजूने आहे, हा विश्वासही कारणीभूत असू शकतोच. तो अधिक बळकट करण्याचं काम पोलीस आणि प्रशासन करताना दिसतं. बंधुत्वाचा, एकमेकांच्या आधाराने पुढे जाण्याचा संदेश देणारी ही यात्रा आता दहशतीचं सावट पसरवताना दिसू लागली आहे.

# विधानसभा निवडणुक तोंडावर पदौरा

## शेख शफिक : दोन दिवसीय बीड जिल्हा दौरा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांच्या दोन दिवसीय बीड जिल्हा दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्या दरम्यान बीड जिल्ह्याच्या प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील व तालुक्यातील आजी–माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार बॅरिस्टर अल्हाज असदुद्दीन ओवैसी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा मा. खासदार इम्तियाज जलील, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला यांच्या आदेशावरून व सूचनेनुसार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसंदर्भात बीड जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. दोन दिवसीय नियोजित दौरा ३ ऑगस्ट रोजी सुरू होणार आहे.

यात प्रथम दुपारी १२:०० वाजता गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात बैठक होणार आहे. त्यानंतर दुपारी ०२:०० वाजता माजलगाव तालुक्यातील पक्षाच्या कार्यालयात बैठक होणार आहे. त्यानंतर धारूर येथील शासकीय विश्रामगृहात दुपारी ०४:०० वाजता बैठक होणार आहे. यानंतर अंबाजोगाई व केज तालुक्यासाठी केज येथील शासकीय विश्रामगृहात संध्याकाळी ०५:०० वाजता बैठक होणार आहे. तर परळी तालुक्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुपारी ०२:०० वाजता पक्ष कार्यालय, मलिकपुरा, परळी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व आजी–माजी पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा

## नियोजन : उत्कृष्ट शिक्षकांना मिळणार पुरस्कार

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा सहोदया संघटनेने एका महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली आहे. संघटना यंदापासून जिल्ह्यातील सीबीएसई शाळांमधील उत्कृष्ट शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करणार आहे. हा निर्णय माजलगाव येथील विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीसाठी बीड जिल्ह्यातील २३ सीबीएसई शाळांचे प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते.

पुरस्काराचा प्रस्ताव पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय गढी येथील दिनेश पगार यांनी मांडला. त्यांच्या या प्रस्तावाला उपस्थित सर्व प्राचार्यांनी एकमुखाने मान्यता दिली. या पुरस्काराद्वारे शिक्षकांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणे हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे. शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जाईल.बीड सहोदया चे सचिव शितल सर्वज्ञ यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुरस्काराचे स्वरूप आणि निवड प्रक्रिया लवकरच जाहीर केली जाईल. तसेच पुरस्कारासाठी अर्ज मागवण्याची प्रक्रियाही लवकरच सुरू होणार आहे. या पुरस्कारामुळे जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.या नवीन पुरस्काराच्या घोषणेमुळे बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात नवीन उत्साह निर्माण झाला असून, शिक्षकांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पान एक वरून

**महावितरण कामाचे श्रेय...**

महावितरण कंपनीच्या माध्यमातून काही झाले तरी आमदारा नमीता यांनी केले आहे असे स्वता भुरट्या आमदारा नमीता मुंदडा म्हणत असतात तरी आमदारा नमीता यांनी महावितरण कंपनीच्या माध्यमातून होणाऱ्या कामाचे मोकाट श्रेय घेऊ नये असे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**आष्टीत बनावट मतदारांची...**

करूनच अर्जाची पडताळणी करावी, तसेच या बाबीकडे दुर्लक्ष करुन चुकीची मतदार नोंदणी किंवा वगळणी झाल्यास सर्वस्वी बीएलओ जबाबदार राहतील. असे तहसीलदार गायकवाड यांनी सांगितले. माजी आ. धोंडे यांनी राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, प्रांताधिका–यांसहतहसीलदारांकडे तक्रार केली होती. याप्रसंगी धोंडे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे आत्तापर्यंत किती अर्ज दाखल झाले, याविषयी माहिती घेतली. तसेच पिक विमा , संजय गांधी निराधार योजना, घरकुल या योजनांची माहिती घेतली. आतापर्यंत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी एकुण ३६६६० महिलांनी अर्ज दाखल केल्याचे सांगण्यात आले.

**बिंदुसरा नदीवरील पुल कम....**

क्षीरसागर यांनी लक्ष घालून उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर पुल कम बंधाऱ्याच्या कामाची टेंडर प्रक्रिया पूर्णत्वास जात असून लवकरच कामाला सुरुवात होईल, अशी माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे.

**एमपीआयडी प्रस्तावास...**

जिल्हाधिकारी तत्सम वरिष्ठ अधिकारी नेमून ठेवीदारांची रक्कम परत करणे करिता सरकारकडून प्रयत्न केले जातील.मुख्य आरोपी बबन शिंदे याला अटक करावी व एम आयडी १९९९ अंतर्गत गुन्ह्यातील आरोपींची मालमत्ता जप्त करावी. अशी मागणी घेऊन ठेवीदार रस्त्यावर उतरले होते.भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी ठेवीदारांच्या मागणीची दखल घेऊन, राज्याचे गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी दाद मागितली आहे. राजेंद्र मस्के यांच्या प्रयत्नाचे ठेवीदार संघर्ष कृती समितीची मार्गदर्शक अशोक हिंगे, अध्यक्ष अ‍ॅड. अप्पासाहेब जगताप, कार्यध्यक्ष डॉ. अरविंद काकडे, मारुती तिपाले, शेख कुतुब भाई, चंद्रकलाताई बांगर, भाऊसाहेब परसे, इंजी सखाराम कळासे, डॉ. उमरजकर, रवींद्र पालीमकर, अच्युत वाघ, आर एस गायकवाड, सूर्यभान नवले, लक्ष्मण हाटवटे, प्रवीण पोपळे, भास्करराव मिसाळ, शहादेव नागरगोजे, सुभाष शिराळे, महेश साळप्पा आदि ठेवीदार बांधवानी आभार व्यक्त केले.

**सरपंच अपात्र प्रकारणी प्रतिवादीची...**

अन्वर पट्टेदार यांनी विभागीय आयुक्तांच्या न्याय दरबारात दि. १ जुलै २०२४ रोजी धाव घेत अपील दाखल केले व विभागीय अप्पर आयुक्तांनी याचिका स्वीकारत बीड कलेक्टर यांच्या निर्णयाला स्थगिती दिली. याप्रकरणी पहिली सुनावणी ही दिनांक २४ जुलै रोजी झाली व दुसरी अंतिम सुनावणी दिनांक ३१ जुलै रोजी पार पडली सदरील अंतिम सुनावणीचा निकाल आयुक्तांनी राखीव ठेवला होता परंतु दिनांक २ ऑगस्ट रोजी आयुक्तांनी निकाल जाहीर केला व सरपंच पट्टेदार यांचे अपील फेटाळण्यात आले म्हणजेच सरपंच पद अपात्र ठरवण्यात आले व जिल्हाधिकारी बीड यांचा आदेश क्रमांक ३७२/२०२३ हा कायम करण्यात आला सदरील प्रकरणांमध्ये प्रतिवादी सय्यद गफुर जामीन यांच्याकडून उच्च न्यायालयाचे ड.रामराजे कवडे व ड.सतीश काळे यांनी बाजू मांडली व यशस्वी केली.

**केजमध्ये पडू लागले...**

आमदार संगीता ठोंबरे यांनी शेतकऱ्यांन साठी का हालचाल केली नाही माजी आमदार संगिता ठोंबरे यांना शेतकरयांन ची काळजी वाटत नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे व आता चार पाच वर्षे गप्प बसून माजी आमदार संगिता ठोंबरे यांना विधानसभा निवडणुक लढवुन आमदारा होण्याचे स्वप्न संगीता ठोंबरे यांना पडले आहे तरी संगिता ठोंबरे यांनी विद्यमान आमदार असता काय दीवे लावले आहेत ते येणाऱ्या काळात आमदारा होऊन काय दीवे लावनार आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# पान एक वरून

**लोकसंगीताने बालकांचे...**

आनंद घेतला. प्रशिक्षक म्हणून शाहीर विलास सोनवणे, पवन शिंदे, नितीन प्रधान, अमर डागा, सुरेश थोरात, सुरेश साळुंखे, नामदेव साळुंखे, संजय पवार, किशोर धोतडमल, सतीश कदम, विलास साठे, दीपक जमदाडे, इंद्रजीत भांगे यांनी आपली भूमिका चोख पार पाडली. विद्यार्थ्यांनीं लोक वाद्यांवर नृत्याचा मनसोक्त आनंद लुटला. ह्या प्रशिक्षण व प्रदर्शनासाठी नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संजय पाटील देवळाणकर, डॉ.विश्वंभर देशमाने, दुष्यंत रामटेके, विजयकुमार राख, मिलिंद शिवनीकर, अमित गाडे, सुरेखा जोशी, सुरेश उपाडे, अनिता शिंदे, अभी इनकर,महेश जगताप, कबीर जाधव यांच्यासह बालरंगभूमी परिषदेचे सर्व कलावंत, सदस्य आदींनी परिश्रम घेतले.

**नाथ प्रतिष्ठानकडून विद्युत...**

कुलकर्णी यांनी केले. आहे. मागील अनेक वर्षांपासून प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यामध्ये तसेच शिवरात्रीच्या महोत्सवामध्ये धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून प्रभु वैद्यनाथांची अशाप्रकारे विशिष्ट सेवा केली जाते तसेच भाविकांसाठी वेगवेगळ्या सुविधाही उपलब्ध करून दिल्या जातात.

**द ग्लॅमोवेल एक्स्ट्रावागांझाची...**

आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा समावेश असेल.आयोजित पत्रकार परिषदेला प्रोलक्स प्रॉडक्शनचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष उन्नीथन आणि महाव्यवस्थापक जयंत यादव उपस्थित होते.

**चिंचोली माळीत वाढदिवस...**

बापु देशमुख, अनिल गलांडे सर,राम नखाते ,अशोक गलांडे ,रविकांत मोठे ,लहु हुंबे,गनेश हुंबे ,माऊली हुंबे ,जालीदर हुंबे ,विजय गाडे ,विकास हुंबे ,मच्छिंद्र हुंबे, अतुल गायकवाड, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते सर्व गावकऱ्यांच्या उपस्थित संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरी करण्यात आला.

**परळीत नेत्रदिपक...**

थिरकणारी तरुणाई,भगव्या पताका घेतलेले वारकर्यांचा सहभाग असलेला हा दिंडी सोहळा उखळवेस,गणेशपार,दिगंबर जैन मंदिर,अंबेवेस मार्गे वैद्यनाथ मंदिराच्या उत्तर घाटावर पोंहचल्यानंतर भजन,आरती करण्यात आली.नेहरु चौक,संत सोपानकाका मंदिर,राणी लक्ष्मीबाई टॉवर,पद्मावती गल्ली मार्गे सायंकाळी ५ वाजता संत सावतामाळी मंदिरात पोंहचल्यानंतर महाप्रसादाने दिंडी सोहळ्याची सांगता झाली.यानंतर रात्री ७ ते ९ वेळेत ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन झाले.

**संत नामदेव महाराजांचा...**

निनादून गेला होता. दुपारी ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी या कीर्तनाचा लाभ घेतला. व आरतीनंतर पुष्पवृष्टीकरुन लागलीच भाविकांनी महाप्रसादाचाही आस्वाद घेतला. यावेळी सर्व समाज बांधव, महिला, युवक, वारकरी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी समस्त शिंपी समाज वडवणी यांनी परिश्रम घेतले.

**आष्टीत नव्या चेहऱ्यामुळे...**

राजकीय पक्ष अस्थिर राजकारणामुळे आपापली वेगळी चुल मांडण्याची प्रत्यक्ष –अप्रत्यक्षपणे तयारी करताना दिसत आहेत. या मतदार संघात आजी–माजी आमदारांसह अनेक इच्छुक नवीन चेहरे देखील या निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सध्या प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते बांधावर जाऊन मतदारांशी वैयक्तिक संवाद साधून भेटीगाठी घेण्यावर भर देताना दिसत आहेत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक ही आष्टी मतदार संघात चौरंगी किंवा त्यापेक्षा अधिक होण्याची चिन्हे आहेत. आगामी निवडणुक राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यातच राष्ट्रवादी (शरद पवार गटाकडून) तरुण व नवीन चेहऱ्याला संधी मिळण्याचे संकेत असल्यामुळे आष्टी तालुक्यातील कडा येथील रहिवासी तथा उच्चशिक्षित व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेले डॉ. महेश थोरवे यांना राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांकडून विधानसभा निवडणुकी संदर्भात सकारात्मकता दिसते आहे. त्यामुळे डॉ. थोरवे यांनी देखील नियोजन पद्तीने या संभाव्य निवडणुकीच्या रिंगणात संपूर्ण ताकदीनिशी तुतारी हाती घेऊन उतरण्याची तयारी केल्याचे दिसून येते. या बीड जिल्ह्यातील बहुचर्चित आष्टी मतदार संघात प्रस्थापित नेत्यांसह नवनवीन चेहरे समोर येणार आहेत. त्या अनुषंगाने या निवडणुकीत अटीतटीचा सामना होण्याची अधिक शक्यता आहे. सध्याच्या राजकीय आखाड्यात राजकारणाची समीकरणे बदलण्याची धमक असणारे व्यक्तिमत्व म्हणून डॉ. थोरवे या नवीन चेह–याच्या नावाची राजकीय वर्तुळात सध्यातरी जोरदार चर्चा आहे.

**केजमध्ये रानडुक्करे घालताहेत...**

आर्थिक फटका बसला आहे. यापूर्वी या परिसरात रानडुक्कर कळपाकडून पिकांचे नुकसान झाले आहे.' डुक्करे आली 'ऊसला वाचवा' अशी म्हणायची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. झालेल्या नुकसानीचा पंचनामा करावा, नुकसानभरपाई मिळावी तसेच या डुक्करांचा वनविभागाने बंदोबस्त करावा,केज तालुक्यातुन व शिंदी गावातील शेतकरयांन कडुन अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122

Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# नापीक, खारजमिनीत बहरणार भातशेती

## कर्जत कृषी संशोधन केंद्रात भाताच्या ३ नव्या जाती विकसीत; बळीराजा आनंदला

**रायगड : पुढारी वृत्तसेवा**


डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे आणि त्यांच्या चमूने अथक प्रयत्नातून विकसित केलेल्या कोकण संजय, कर्जत-१० आणि ट्रॉम्बे कोकण खारा या तीन विविध कालावधीच्या वैशिष्ट्यपूर्ण भात जातींना (वाणांना) राज्यस्तरीय वाण प्रसारण समितीने शुक्रवारी मान्यता दिल्यावर केंद्रीय वाण प्रसारण समितीनेही या जाती घोषित केल्याने विद्यापीठात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

कोकणातील तसेच राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध गुण वैशिष्ट्ये असणाऱ्या या तिन्ही भात वाणांचे बियाणे पुढील हंगामापासून उपलब्ध करून देण्यात येतील, असे डॉ. भरत वाघमोडे यांनी सांगितले. दरम्यान डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून आता पर्यंत संशोधीत भात जातींची (वाणांची) संख्या आता ३९ झाली आहे.

पेरणी ते लोंबी असा सरासरी साठ दिवसांचा कालावधी असणाऱ्या या तीन नव्या जातीपैकी कोकण संजय हे वाण निमगरवा श्रेणीतील असून लांबट बारीक दाण्याचा तांदूळ असणाऱ्या या वाणाची हेक्टरी उत्पादकता५० ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर आहे. हे वाण प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे. शिजवल्यानंतर तांदळाची गुणवत्ता उत्तम असून हे वाण राज्यातील भात पिकविणाऱ्या विभागासाठी शिफारस करण्यात आले आहे.

कर्जत-१० हे वाण गरवा श्रेणीतील असून त्यांची उत्पादकता ४५ ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर आहे. हे वाण पाणथळ जमिनीसाठी शिफारस करण्यात आले आहे. प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे. अख्ख्या तांदळाचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असून शिजवल्यानंतर भाताची गुणवत्ता उत्तम आहे.


हे तिन्ही वाणे भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल, असा विश्वास डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी व्यक्त केला आहे. कृषी संशोधन केंद्राच्या या ३ भात जाती विक्सीत झाल्यामुळे बळीराजा आनंदीत झाला असल्याचे चित्र आहे.



**कोकण संजय हे वाण निमगरवा श्रेणीतील असून वाणाची हेक्टरी उत्पादकता ५० ते ५५ क्विंटल प्रति हेक्टर आहे.**



**कर्जत-१० हे वाण गरवा श्रेणीतील असून वाणाची उत्पादकता ४५ ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर आहे.**






**लांबट बारीक दाणा**

**ट्रॉम्बे कोकण खारा हे वाण निमगरवा श्रेणीतील लांबट बारीक दाण्याच्या प्रकारातील असून ४० ते ४५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन देणारे वाण आहे. कोकण विभागातील क्षारपड जमिनीसाठी याची प्रामुख्याने शिफारस करण्यात आली असून ६-ईसी पर्यंत क्षार सहन करणारे हे वाण आहे.**

---

## संक्षिप्त



**नवी दिल्ली : केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन चर्चा केली.**

### रेल्वेच्या पुणे विभागाचे प्रश्न लवकरच मार्गी लागणार; मंत्री मोहोळांची रेल्वेमंत्र्यांशी चर्चा

**नवी दिल्ली :** रेल्वेच्या पुणे आणि विभागातील विविध प्रलंबित विषय मार्गी लावण्यासंदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन चर्चा केली. प्रश्न मार्गी लावतानाच पुण्यातून वंदे भारत ट्रेन सुरू कराव्यात यावर सकारात्मक चर्चा झाली. पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वेचे अनेक विषय गेली काही वर्षे प्रलंबित आहेत. त्यावर लवकरात लवकर तोडगा काढला जावा, यासाठी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी पुढाकार घेतला आहे. रेल्वेमंत्र्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिल्याने हे विषय लवकरच मार्गी लागणार आहेत. याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, पुणे-दिल्ली वंदे भारत स्लिपर ट्रेन, पुणे-लोणावळा रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण, पुणे-अहिल्यानगर रेल्वे कनेक्टिव्हिटी, पुणे रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण, उरुळी कांचन येथे नवे टर्मिनल आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

### मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे अर्ज स्वीकारले जात नसल्याने रायगडात ज्येष्ठांच्या तक्रारी

**रायगड :** मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या अंमलबजावणीबाबत रायगड जिल्हयातील ज्येष्ठ नागरिक संस्थांनी तक्रारी दाखल केल्यानंतर जिल्ह्यातील यंत्रणा कामाला लागली आहे. योजनेचे अर्ज स्वीकरले जात नसल्याबाबत ज्येष्ठ नागरिक संस्थेने समाजकल्याण विभागाकडे तक्रार केली आहे. त्यामुळे आता रायगड जिल्हा समाज कल्याण विभागाने एक जिल्हातील नगरपालिका, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना पत्र लिहून कार्यवाही करण्याचे कळविले आहे. या योजनेत जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी सहभागी होण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मिशन मोडवर काम सुरु केले आहे.

### आशा सेविकांना मोबाईल अन् रिचार्जही

**नागपूर :** राज्य सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने महिला मतदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. लाडकी बहीण योजनेसोबतच आशा सेविकांनादेखील निवडणूकपूर्व एक भेट दिली आहे. मोबाईलसोबतच त्यांना आता रिचार्जचीही व्यवस्था सरकारने केली आहे. यासंबंधीची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नागपुरात केली. खनिज विकास निधीमधून वर्षभर रिचार्जची ही रक्कम दिली जाईल, याविषयीची मागणी गेले अनेक दिवस केली जात होती. यासोबतच वाढीव मानधनसंदर्भात जीआर निघाला; मात्र अजून पैसे मिळाले नाहीत, अशी तक्रार लक्षात घेता या महिन्यात ते पैसे जमा होतील, असेही आश्वासन फडणवीस यांनी दिले.

### लाचेच्या गुन्ह्यातील एपीआय निलंबित

**पुणे :** लाचेची मागणी केल्याच्या गुन्ह्यातील सहायक पोलिस निरीक्षक चेतन चंद्रकांत थोरबोले यांना निलंबित करण्यात आले आहे. सहपोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. थोरबोले हे लोणीकंद पोलिस ठाण्यात नेमणुकीला होते. एका तक्रार अर्जामध्ये अहवाल निरंक पाठविण्यासाठी व त्यामध्ये तक्रारदारांना भविष्यात त्रास न होण्यासाठी प्रथम पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यानंतर तडजोडीअंती एक लाख रुपये मागण्यात आले होते. थोरबोले यांच्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा सर्वसामान्य जनमानसात मलिन झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

### फडणवीस-देशमुख एका मंचावर; पण संवाद नाही

**नागपूर :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी प्रथमच आरोप-प्रत्यारोप आणि पेन ड्राईव्ह युद्धानंतर नागपुरातील कार्यक्रमात एका मंचावर आले. मात्र, या दोघांनीही सुरक्षित अंतर व संवाद टाळल्याचे पाहायला मिळाले. पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या नागपूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देशमुख उपस्थित होते.



**गोंदिया : नवेगाव बांध ते गोठणगाव मार्गावर खचलेला पूल.**

### पूल कोसळला; अनेक गावांचा संपर्क तुटला

**गोंदिया :** जिल्ह्यात संततधार पावसामुळे अनेक मार्ग बंद झाले असतानाच पावसामुळे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगाव बांध ते गोठणगाव मार्गावरील पूल खचल्याने या मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. गोठणगाव परिसरातील अनेक गावांचा नवेगाव बांधशी संपर्क तुटला आहे. अर्जुनी मोरगाव तालुका जलमय झाला असून, जमीनसुद्धा दलदल झाली आहे. पावसामुळे अनेक रस्ते बंद आहेत. त्यातच रात्रीच्या सुमारासगोठणगाव तलावाजवळील नाल्यावरील पूल अचानकपणे खचला. सुदैवाने यावेळी या मार्गावरून रहदारी बंद असल्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही.

---

# जरांगे यांचे अटक वॉरंट रद्द

## वैद्यकीय कारणांमुळे हजर राहता आले नसल्याचे दिले कारण

- **तीन हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर वॉरंट केले रद्द**
- **३ सप्टेंबरला पुढील सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**उपोषणानंतर निर्माण झालेल्या वैद्यकीय समस्यांमुळे न्यायालयात हजर राहता आले नसल्याची माहिती मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी शुक्रवारी (दि.२ ऑगस्ट) न्यायालयाला दिली. त्यानंतर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमृत बिराजदार यांनी नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्याप्रकरणात सुनावणीला हजर न राहिल्याने काढलेले अटक वॉरंट रद्द केले. तीन हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर न्यायालयाने हा आदेश दिला.**



३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले. नाटकांचे प्रयोग आयोजित करून नाट्यनिर्मात्याचे पैसे न दिल्याप्रकरणी जरांगे यांच्यासह अर्जुन प्रसाद जाधव आणि दत्ता बहीर (सर्व रा. अंबड, जालना) यांच्या विरोधात फसवणूक व अपहार केल्याप्रकरणी कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. याबाबत धनंजय घोरपडे (रा. वारजे) यांनी न्यायालयात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या निर्देशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात न्यायालयाने जरांगे यांना दोनदा समन्स बजावले होते.

न्यायालयात जरांगे यांच्यातर्फे युक्तिवाद करताना ॲड. हर्षद निंबाळकर व पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष संतोष खामकर म्हणाले, २० ते २४ जुलै २०२४ रोजी जरांगे उपोषणास बसले होते. त्यानंतर, डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार ते प्रवास करण्यास सक्षम नव्हते. त्यामुळे, सुनावणीच्या दिवशी त्यांना न्यायालयात उपस्थित राहता आले नाही. याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. त्याला सरकार पक्षातर्फे ॲड. नीलिमा इथापे- यादव यांनी विरोध केला. जरांगे यांनी केलेला अर्ज खोटा असून, तो मान्य होण्यास पात्र नाही. अशा प्रकरणांचा त्वरित निपटारा करण्याबाबत न्यायालयाकडून योग्य ते प्रयत्न होणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला.

### रुग्णवाहिकेतून जरांगे न्यायालयात

शुक्रवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास जरांगे पुण्यात दाखल झाले. त्यानंतर, शनिवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास ते सलाईन लावलेल्या अवस्थेत रुग्णवाहिकेतून न्यायालयात हजर झाले. एकच्या सुमारास रुग्णवाहिकेतून न्यायालयाबाहेर पडले.

### गुन्ह्यातून नाव वगळण्यासाठी अर्ज

बचाव पक्षामार्फत जरांगे यांचे गुन्ह्यातून नाव वगळण्यासाठी न्यायालयात अर्ज करण्यात आला. त्यावर न्यायालयाने फसवणुकीचे हे प्रकरण तडजोडीने सुटते का ते पाहावे, असे निर्देश बचावपक्षाला दिले.

---

# भूमिअभिलेख विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या

- **सात जिल्हा अधीक्षकांसह ९० उपअधीक्षकांचाही समावेश**
- **विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केले बदल**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर महसूल विभागांतर्गत असलेल्या भूमिअभिलेख विभागात कार्यरत असलेल्या गट-अ आणि ब या संवर्गात कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. या बदल्यांमध्ये सात जिल्हा अधीक्षक (एक विनंती बदली) तर सुमारे ९० तालुकास्तरावर कार्यरत असलेले ९० उपअधीक्षक यांचा समावेश आहे. दरम्यान, बदल्यामध्ये महिला अधिकाऱ्यांना दुय्यम स्थान दिले असल्याचे दिसून आले.

बदल्यांचे आदेश शासनाचे सहसचिव संजय इंगळे आणि रमेश जगताप यांनी राज्यपालांच्या आदेशानुसार काढले आहेत. नगर येथे जिल्हा अधीक्षक असलेले सुनील सोपान इंदलकर यांची बदली विनंतीने करण्यात आली आहे. त्यांची बदली रायगड जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख या पदावर करण्यात आली आहे. कोकणातील एका जिल्ह्यात कार्यरत असलेल्या महिला अधिकारी यांची बदली मात्र मराठवाड्यातील लातूर या जिल्ह्यात करण्यात आली आहे. याशिवाय राज्यातील नव्वद ९० तालुक्यांत कार्यरत असलेल्या उपअधीक्षकांच्या बदल्या इतरत्र करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये मराठवाडा आणि विदर्भातील विविध जिल्ह्यांतील तालुक्यात कार्यरत असलेल्या सर्वाधिक उपअधीक्षकांचा बदल्यामध्ये समावेश आहे.

गेल्या काही वर्षांपासून भूमिअभिलेख विभागात कार्यरत असलेले गट - अ आणि गट-ब विभागातील अधिकारी पुण्यातच ठाण मांडून बसलेले आहेत. त्यांच्या बदल्यांचे आदेश निघाले की, संबंधित अधिकारी नेमणुकीच्या ठिकाणी हजर होतच नाहीत.

---

# शेतीला दिवसा वीजपुरवठ्यासाठी प. महाराष्ट्रात सौर प्रकल्प उभाणार

## सौरऊर्जेत १ हजार ९१ मेगावॅटची भर पडणार



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील पुण्यासह कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रात असलेल्या जिल्ह्यांतील शेतीला दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी १ हजार ९१ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प सुरू होणार आहेत. त्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या राज्य शासनाने दिल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत २७६ उपकेंद्रांसाठी एकूण १ हजार ९९१ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ९८ उपकेंद्रांसाठी ८६७ मेगावॅटच्या सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पांचा समावेश आहे. आतापर्यंत ७ हजार ६६९ एकर शासकीय जमिनी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यातील या २७६ उपकेंद्राच्या परिसरातील हजारो शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा होणार आहे.

### सौर प्रकल्प उभारणीचे काम सुरू

पश्चिम महाराष्ट्रात सौरऊर्जा निर्मितीच्या पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यात ५४ उपकेंद्रांसाठी ४२९ मेगावॅट, सातारा जिल्ह्यातील ३९ उपकेंद्रांसाठी २०८ मेगावॅट, सांगली- ४१ उपकेंद्रांसाठी ३१७ मेगावॅट, कोल्हापूर - ४४ उपकेंद्रांसाठी १७० मेगावॅट आणि सोलापूर जिल्ह्यातील ९८ उपकेंद्रांसाठी ८६७ मेगावॅट असे एकूण २७६ उपकेंद्रांसाठी १ हजार ९९१ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे.

### सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे फायदे

शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करण्यात यावा, ही शेतकऱ्यांची मागणी होती. तसेच ज्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होतील, त्या प्रत्येक ग्रामपंचायतींना पाच लाख रुपये प्रत्येक वर्षी देण्यात येणार आहेत. तीन वर्षांत १५ लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. विशेष म्हणजे सौरऊर्जा प्रकल्प उभारणे, ती २५ वर्षे चालवणे आणि देखभाल व दुरुस्ती करणे याद्वारे राज्याच्या ग्रामीण भागात अंदाजे ६ हजार पूर्णवेळ, तर १३ हजार अर्धवेळ रोजगार निर्माण होतील. तसेच ग्रामपंचायतींना अंदाजे २०० कोटींपेक्षा जास्त अनुदान प्राप्त होणार आहे.



**ठाणे : येथील घोडबंदर रोडवरील पाटलीपाडा पुलाजवळ रंगाच्या बादल्या घेऊन जाणारा ट्रक शुक्रवारी सकाळी उलटला. त्यामुळे रंग पसरला. रस्ता साफ करताना कामगार. यावेळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. (छाया : अनिषा शिंदे)**

---

# जागृतीअभावी राज्यात 'आई योजना' पोरकी

**कोल्हापूर : अनुराधा कदम**

पर्यटन उद्योगात महिला उद्योजकांचा सहभाग वाढावा, यासाठी राज्य सरकारने आई योजनेची घोषणा केली. मात्र, सरकारकडून प्रभावी जागृतीअभावी योजनेवरच पोरके होण्याची वेळ आली आहे. गेल्या पाच महिन्यांत आई या महिला केंद्रित पर्यटन धोरण योजनेसाठी राज्यातून केवळ ११५ महिलांनी अर्ज केला असून, त्यापैकी अवघ्या १० महिला या योजनेच्या लाभार्थी झाल्या आहेत.

राज्य सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये आई ही योजना सुरू केली. पर्यटन क्षेत्रात उद्योजक म्हणून कार्यरत असलेल्या आणि या क्षेत्रात नव्याने पाऊल टाकणाऱ्या महिलांना १५ लाख रुपयांच्या कर्जापर्यंत रकमेवर व्याज माफ असणार आहे. आई योजनेसाठी निकष, अटी यांचे स्वरूप पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजकांच्या दृष्टीने क्लिष्ट असल्याची चर्चा आहे.

> "आई योजना चांगली असूनही तळागाळापर्यंत न पोहोचल्याने प्रतिसाद कमी मिळत आहे. अशा योजना समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने प्रसारमाध्यमे, स्थानिक उपक्रम यांचा वापर केला पाहिजे.
>
> **- डॉ. मीना पोतदार,**
> समन्वयक, पर्यटन व प्रवास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

# कोकणात नद्या गाळाने भरल्या; शहरे तुंबली!

## दरवर्षीच्या पुराच्या टांगत्या तलवारीमुळे नागरिक हैराण

**ठाणे/सिंधुदुर्ग : पुढारी वृत्तसेवा**




कोकणातील प्रमुख पाच शहरांत जुलैच्या अतिवृष्टीत पाणी शिरले. यात ठाणे, बदलापूर, भिवंडी, कल्याण डोंबिवली आणि शहापूर या शहरांत रस्त्यावर पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. रायगड जिल्ह्यात महाडमध्ये सावित्री नदीचे, रोह्यात कुंडलिका नदीचे आणि नागोठण्यात आंबा नदीचे पाणी शिरले. दक्षिण कोकणात जगबुडी, वाशिष्ठी, गड नदीचेही पाणी काही भागांत शिरले. हे पाणी शिरण्याचे कारण नद्यांमधील गाळ हेच आहे.

रायगड जिल्ह्यात आंबा, कुंडलिका आणि सावित्री नद्यांचे पाणी नागरी वस्तीत शिरले होते. या नद्यांचा गाळ काढला जात नसल्याने आणि काढलाच तर नदीच्या बाजूलाच फेकला जात असल्याने पुन्हा तो गाळ नदीत येऊन नद्या भरतात. त्यामुळे पुराचे पाणी नागरी वस्त्यांमध्ये शिरत आहे. २५ जुलैचा पूर सर्वांनाच हादरवणारा होता. पूररेषा निश्चित करून नागरी वस्त्यांचे स्थलांतर हा यासाठी मार्ग आहे. लोकप्रतिनिधी, बांधकाम व्यावसायिकांच्या मागणीनंतर जलसंपदा विभागाने पूररेषेची पुनर्तपासणी त्रयस्थ संस्थेकडून करण्याचे सूचवले होते. त्यानुसार आयआयटी रूरकीकडे यासाठी विनंती करण्यात आली. मात्र, त्यासाठीच्या खर्चाची पूर्तता न केल्याने तो प्रस्ताव बारगळला आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता नरेंद्र महाजन यांनी दिली आहे. सर्वच नद्यांची पूररेषा निश्चित करून नागरी वस्त्या स्थलांतरित करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले आहेत. परंतु, त्याची कार्यवाही मात्र कागदावरच आहे. तुंबलेल्या शहरांमध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल, नागोठणे, गोवा, महाड या शहरांचाही समावेश होता, तर रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, चिपळूण, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ, मालवण भागात पुराचे पाणी येण्याचे प्रमाण अधिक आहे. (समाप्त)



**(छाया : सुधीर नाझरे)**

### दीड लाख लोक पूररेषेच्या परिघात

ठाणे शहरात २५ ते ३० ठिकाणी पाणी साचण्याच्या घटना घडल्या. यात दिवा, कळवा, मुंब्रा या भागांचा समावेश आहे. लोकांचे संसार पाण्यात बुडाले. उल्हास नदीला पूर आल्याने बदलापुरातील सखल भागांत पाणी शिरले. बदलापूरच्या पूर रेषेचा प्रश्न गेले अनेक दिवस चर्चेत आहे. पूररेषा निश्चित करताना अनेक नागरी वस्त्या त्या रेषेत आल्या आहेत. बदलापूर पश्चिम येथे ७० ते ८० घरांत पाणी शिरले होते. सध्या दीड लाख लोक पूररेषेच्या परिघात राहत आहेत. त्यांचा प्रश्न सध्या जटिल बनला आहे.

### सिंधुदुर्गच्या सखल भागाला पुराचा सर्वाधिक फटका

मुसळधार पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात सखल भागात पुराचा सर्वाधिक फटका बसला. त्यामुळे शेकडो एकर भातशेती पाण्याखाली गेली. फळबागायतींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पुराचा फटका कुडाळ, वेंगुर्ला, कणकावली, दोडामार्ग या तालुक्यांना अधिक बसला. नदीकिनारील भागात शंभरहून अधिक घरांमध्ये पुराचे पाणी शिरून जीवनावश्यक साहित्यासह घरे व गोठ्यांची पडझड होऊन मोठे नुकसान झाले. सह्याद्री पट्ट्यात जुलैच्या पहिल्या आठवड्यानंतर मुसळधार पावसाने कहर केला. कर्ली, गडनदी, तिलारी नदी, पिठढवळ आदी नद्या दुधडी भरून वाहू लागल्या. परिणामी या नद्यांच्या किनारी भागात पूरस्थिती निर्माण झाली. कधी नव्हे तो मुंबई - गोवा महामार्ग क्र. ६६ चौदा तास पाण्याखाली राहिला. जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. जुलै महिन्यात पंधरा दिवसांत सलग चार वेळा नद्यांना पूर आला. कुडाळ भंगसाळ (कर्ली) नदी, पावशी बेलनदी, वेताळबांबर्डे हातेरी नदी, हुमरमळा पिठढवळ, तिलारी नदी या सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. या नद्यांच्या पुराचे पाणी नदीकिनारील परिसरात शिरले.

# सोनेरी कॉर्नर

## जान्हवीनंतर खुशी पडली प्रेमात

जान्हवी कपूर ही शिखर पहारियाबरोबर रिलेशनशिपमध्ये असताना तिने आपल्या प्रेमाची जाहीर कबुली दिली आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नातील प्रत्येक कार्यक्रमात जान्हवी शिखरबरोबर उपस्थित होती. जान्हवीनंतर आता तिच्या छोट्या बहिणीच्या नात्याची चर्चा रंगली आहे. खुशीचे नाव अभिनेता वेदांग रैनाशी जोडण्यात येत आहे. खुशी व वेदांग यांनी झोया अख्तरच्या 'द आर्चीज' या सिनेमातून बॉलीवूड पदार्पण केला आहे, त्यावेळपासून त्यांच्या नात्याची चर्चा आहे. दोघेही एकत्र सोहळ्याला जाताना दिसत असतात. अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नात खुशी वेदांगबरोबर पोहोचली होती. दोघांनी एकत्र पोजही दिल्या होत्या. त्यानंतर आता वेदांग व खुशीचा ज्येष्ठ अभिनेत्री रेखासोबतचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जान्हवीचा 'उलझ' या सिनेमा प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचं स्क्रीनिंग गुरुवारी ठेवले होतं. यावेळी अनेक बॉलीवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. रेखा यांनीही जान्हवीच्या चित्रपटाच्या स्क्रीनिंगला हजेरी लावली. यावेळी त्यांनी तिला आशीर्वाद दिले व तिच्याबरोबर फोटोही काढले. त्यानंतर त्यांचा आणखी एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये त्या वेदांग व खुशीबरोबर दिसत आहेत. रेखा खुशी व वेदांगचे हात पकडून इव्हेंटमधून बाहेर पडल्या. यावेळी हे तिघेही गप्पा मारत हसत होते. यानंतर रेखा यांनी वेदांग व खुशीला मिठी मारून आशीर्वादही दिले.



## एक खेळ करणार सर्वांची पोलखोल



खिलाडी अक्षय कुमार याचा 'खेल खेल में' मल्टिस्टारर सिनेमा प्रदर्शित झाला आहे. हसवता हसवता एक महत्त्वाचा विषय 'खेल खेल में' सिनेमाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जात आहे. सिनेमाचा ट्रेलर तीन मिनिटांचा असून, यातून अनेक गोष्टींचा उलगडा करण्यात आला आहे. ट्रेलरमध्ये ७ श्रीमंत घरातील लोक एकमेकांचे मित्र असतात. यात सात पैकी तीन जोडपी आहेत. पुढे हे सर्वजण एका हॉटेलमध्ये मजा-मस्ती करण्यासाठी जाता. त्यानंतर एक खेळ खेळला जातो. दिवस उजाडत नाही तोपर्यंत प्रत्येकाच्या फोनमध्ये रात्रभर एखादा फोन, मॅसेज किंवा अन्य गोष्टींचे अपडेट झाले तर ते सर्वांना कळणार. आता या खेळामुळे नात्यांची समीकरणं कशी बदलणार, ही बाब सिनेमात दाखवली जाणार आहे. या सिनेमात अक्षय कुमारसोबत वाणी कपूर, तापसी पन्नू, फरदीन खान, मी वर्क, आदित्य सील आणि प्रज्ञा जैस्वाल हे कलाकार झळकणार आहेत. 'खेल खेल में' सिनेमा हा सिनेमा १५ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. याचवेळी 'स्त्री -२' हा सिनेमाही रीलिज होणार आहे. त्यामुळे 'खेल खेल में' आणि 'स्त्री २' यापैकी कोणता सिनेमा हिट आणि कोणता फ्लॉप होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

## सोनाक्षीचा कुटुंबाशी अजूनही अबोला!

सोनाक्षी सिन्हा आणि अभिनेता झहीर इक्बाल यांच्या लग्नाला आता महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत दोघांनी रजिस्टत लग्न केले.त्यानंतर दोघांनी सेलिब्रिटींसाठी मोठी पार्टीच आयोजित केली होती. सोशल मीडियावर त्यांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओही व्हायरल झाले होते. सोनाक्षी आणि झहीर यांच्या लग्नाला कुटुंबीयांचा विरोध होता असेही बोलले जाते. इतकेच नाही, तर सोनाक्षीचा भाऊही लग्नाला आले नव्हते. सोनाक्षी केवळ वडील शत्रुघ्न सिन्हा आणि भाऊ कुशयांना फॉलो करते. लग्नाआधी सोनाक्षीच्याआईने लेकीला अनफॉलो केल्याची माहितीही समोर आली होती. यावर सोनाक्षी किंवा तिच्या कुटुंबीयांपैकी कोणी अधिकृत वक्तव्य केलेले नाही. लग्नानंतर सोनाक्षी खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. सोनाक्षी -झहीरचे लग्न वांद्रे येथील घरात झाले होते. सोनाक्षीने २३ जून रोजी इक्बालसोबत लग्न केले. लग्नानंतर सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करत सोनाक्षी भावनाही व्यक्त केल्या होत्या. सुमारे सात वर्षे डेट केल्यानंतर दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला. आता खरेच सोनाक्षीसोबत कुटुंबीयांचा अबोला आहे काय याची चर्चा रंगल्या आहेत.



## तू बॉलीवूडचा श्वास आहेस

लोकप्रिय गायक अरिजित सिंग याची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे त्याने अनेक संगीत कार्यक्रम रद्द केले असल्याचे सांगितले जात आहे. अरिजितने सोशल मीडियावर एका पोस्ट शेअर करत प्रकृती स्थिर नसल्याची माहिती दिली आहे. कॉन्सर्ट अचानक रद्द झाल्याने अरिजीतने खंतही व्यक्त केली आहे. आता त्याची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. पोस्ट शेअर करत अरिजित म्हणतो की, महत्त्वपूर्ण माहिती आणि सूचना! सर्व चाहत्यांना एक गोष्ट सांगताना दुःख होत आहे, काही वैद्यकीय कारणामुळे या महिन्यात होणारे सर्व संगीत कार्यक्रम रद्द करावे लागत आहे. शोसाठी सर्वांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. तुमचे प्रेम माझी शक्ती माझ्यासोबत आहे. आता त्याच्या पोस्टवर चाहते प्रतिक्रिया देत आहेत. तू बॉलीवूडचा श्वास आहेस अशी एकाने, तर अरिजित प्रकृतीची काळजी घे, अशी दुसऱ्या एकाने लवकरच ठिक हो, अशा प्रतिक्रिया चाहत्यांकडून दिल्या जात आहे. अरिजितला नक्की काय झाले आहे हे मात्र अद्याप समोर आलेले नाही.



## हे आहे शिल्पाच्या फिटनेसचे रहस्य

शिल्पा शेट्टी ही ९० दशकांतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. ती फिटनेससाठीही ओळखली जाते. आज कोणत्या ओळखीची गरज नाही. आता शिल्पा बॉलीवूडमध्ये पूर्वीप्रमाणे सक्रिय नसली तरी, कोणत्या न कोणत्या कारणामुळे नेहमीच चर्चेत असते. शिल्पाचा फिटनेस आणि सौंदर्याची नेहमीच चर्चा रंगलेळी असते. वयाच्या ४९ व्या वर्षीही शिल्पाचे सौंदर्य कमी झालेले नाही. शिल्पाच्या सौंदर्यामागे नक्की काय रहस्य आहे हे जाणून घेण्याची सर्वांची इच्छा असते. शिल्पा फिटनेसची नेहमीच काळजी घेते. एका शिल्पा म्हणाली, रोज सकाळी उठल्यानंतर मी कोमट पाणी पिते. कोमट पाण्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. त्यामुळे त्वचा स्वच्छ होते. पाण्यात आवळ्याचा ज्यूस टाकून पिते. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन-सी विपुल प्रमाणात असते त्यामुळे त्वचेमधील कोलेजन वाढण्यास मदत होते. चेहऱ्याला मॉश्चराईज करायला विसरत नाही. मॉश्चराईजमुळे स्किन सॉफ्ट राहते. त्यामुळे मुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाही. नियमित योग आणि ध्यानही करते, त्यामुळे शरीर आणि स्किन चांगलं राहते.शिल्पा नेहमीच वर्कआऊटचे फोटो आणि व्हिडीओही सोशल मीडियावर पोस्ट करत असते. सध्या केवळ शिल्पाच्या फिटनेसची चर्चा सुरू आहे.



## आज दिनांक

### पंचांग

**सूर्योदय :** स. ६.१८, **सूर्यास्त :** सायं. ७.१२, **चंद्रोदय :** ०५. ५३, **चंद्रास्त** ०६.४५ , **तिथी :** चतुर्दशी, **नक्षत्र :** पुनर्वसु, **मास :** आषाढ, **पक्ष :** कृष्ण, **राहूकाळ :** ०९.३१ ते ११.०८, **शुभकाळ (अभिजित मुहूर्त) :** १२ ते १२.५३ **यमगंड :** २.०७ ते ३.४८, **यमघंट :** ०३.३५ ते ०३.२८.

### दिनविशेष

- स्वातंत्र्यसेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांची १२५ वी जयंती
- भारतीय अणुऊर्जा आयोगाची स्थापना (१९४८)
- सोलापूर विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन (२००४)
- लेखिका सरोजिनी वैद्य यांचे निधन (२००७)

### राशिभविष्य

– ज्यो. मंगेश महाडिक

**मेष :** जोडीदाराच्या अनुपस्थितीची उणीव भासण्याची शक्यता. एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी आश्चर्याचा सुखद धक्का बसेल.

**वृषभ :** ज्येष्ठांनी तब्येतेची काळजी घेण्याची गरज. करमणुकीवर अतिखर्च करण्याच्या आपल्या स्वभावाचे परीक्षण करा

**मिथुन :** प्रिय व्यक्तीकडून आलेल्या भेटवस्तूंमुळे दिवस उत्तेजनापूर्ण असेल. प्रेमजीवनात काहीतरी खास मिळणार आहे.

**कर्क :** प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे मनोधैर्य उंचावेल. आज तुम्ही योग्य बचत करण्यात यशस्वी व्हाल. काहीतरी खरेदी कराल.

**सिंह :** तुम्हाला शांत ठेवणाऱ्या उपक्रमांमध्ये स्वत:ला गुंतवा. हुशारीने गुंतवणूक करा. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामे पूर्ण करण्यासाठी लाभदायक दिवस.

**कन्या :** प्रेमात कोणीही फूट पाडू शकणार नाही. कलात्मक क्षमतेमुळे अनेक लोकांची कौतुकाची थाप मिळेल आणि अनपेक्षित बक्षीसही मिळेल.

**तूळ :** भूतकाळातील घटनांचा विचार करीत बसाल, तर नैराश्य प्रकृतीवर परिणाम करील. शक्य तेवढे शांत राहण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** सामाजिक स्नेहमेळावे आनंदी करतील. महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका.

**धनू :** जे वचन पूर्ण करू शकणार नाही ते देऊ नका. कार्यशील असा दिवस आहे. समाजातही वेगवेगळ्या लोकांशी भेटीगाठी होतील.

**मकर :** आजचा दिवस अत्यंत महान आहे, कारण तुमच्या कामाकडे लक्ष जाईल, ते तुम्हास हवे असेल. त्यामुळे आनंदात भर पडेल.

**कुंभ :** आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल.

**मीन :** नियमित केलेल्या व्यायामामुळे मन प्रफुल्लित राहील. कुटुंबातील कुणी सदस्यांच्या आजारी पडण्यामुळे आर्थिक चिंता येऊ शकते.

### गुगल ट्रेंडस्


- स्वप्निल कुसाळेच्या ऑलिम्पिक कास्य पदकाची बातमी ट्रेंड बनली.
- अंशुमान गायकवाड यांच्या निधनानंतर त्यांची माहिती शोधली गेली.
- अनुसूचित जाती-जमातीसंबंधी निकालाची माहिती घेतली गेली.
- दर्श अमावस्येची माहिती ट्रेंड बनली.

# अर्थ-उद्योग

## रोबो कॉलने ग्राहक हैराण

▪ टेलिकॉम अथॉरिटीने कंपन्यांकडून मागविली माहिती

**नवी दिल्ली :** टेलिमार्केटिंग, फसव्या जाहिराती आणि डिजिटल फसवणूक करणाऱ्या चोरट्यांनी अनोंदणीकृत मोबाईल क्रमांकाद्वारे रोबोकॉल करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ग्राहक हैराण झाले असून, अनेकांनी टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाकडे (ट्राय) तक्रार दाखल केली आहे. वाढत्या तक्रारींची दखल घेत ट्रायने टेलिकॉम कंपन्यांकडून अशा क्रमांकाची माहिती तत्काळ सादर करण्यास सांगितले आहे.



एप्रिल ते जून या कालावधीत ट्रायकडे स्पॅम आणि रोबो कॉल वाढल्याच्या हजारो तक्रारी दाखल झाल्या आहेत. टेलिमार्केटिंग करण्यासाठी क्रमांक नोंदणीकृत करावा लागतो. अशा टेलिमार्केटिंगसाठी सरकारने १४० क्रमांकाची सीरिज उपलब्ध करून दिली आहे. तसेच, एकाच वेळी किती जणांना संपर्क साधता येईल, याचीही मर्यादा ठरलेली असते. सोबतच टेलिमार्केटिंगसाठी विशेष क्रमांक दिला जातो. मात्र, साधारण दहा आकडी मोबाईल क्रमांकाचा वापर करीत असे कॉल सर्रास केले जात आहेत. त्यामुळे मोबाईलधारकांना अशा क्रमांकाची नेमकी माहिती समजत नाही.

ग्राहकांनी रोबो कॉलबाबत तक्रार केली आहे. अशा क्रमांकांचा शोध घेऊन असे कॉल लावणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचे ट्रायने सांगितले आहे. टेलिकॉम कंपन्यांकडून अशा क्रमांकांची माहिती मागविली आहे. काही क्रमांक ग्राहकांनीही कळविले आहेत. अशा सर्व क्रमांकांचा शोध घेऊन यातील दोषींना शिक्षा केली जाणार आहे. सर्वसाधारण क्रमांकाने तसेच ७३१ आणि १२९ या क्रमांकाने सुरू होणाऱ्या नंबरच्या तक्रारी आल्या आहेत. टेलिमार्केटिंग करणाऱ्यांना सर्वसाधारण क्रमांकावरून असे कॉल करता येत नाहीत. मात्र, काही अनधिकृत संस्था अथवा व्यक्ती असे प्रकार करीत आहेत. त्यांना रोखण्याची गरज असल्याचे ट्रायने म्हटले आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ग्राहकांना २५ विविध क्रमांकांवरून सर्वाधिक स्पॅम कॉल करण्यात आले आहेत. या क्रमांकाची संपूर्ण माहिती ट्रायने टेलिकॉम कंपन्यांकडे मागितली आहे. सध्याचे नियम कडक नसल्याने अशा कॉलला पायबंद घालणे अवघड होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### ...म्हणून वाढले मनोबल

नोंदणी नसलेल्या मोबाईल क्रमांकावरून टेलिमार्केटिंग केल्याचे आढळल्यास संबंधित क्रमांक दोन वर्षांसाठी बंद केला जातो. कोणत्याही पद्धतीच्या गुन्ह्याची नोंद होत नाही. त्यामुळे अशा व्यक्तींचे मनोबल वाढत आहे. कायदा अधिक कडक केल्यास त्यावर वचक ठेवणे शक्य होईल, असे ट्रायमधील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### काय आहे रोबो-स्पॅम कॉल?

संगणक आधारित रेकॉर्ड केलेले मेसेज, ध्वनी संदेश असतो. एकाच वेळी अनेकांना असे मेसेज कॉल केले जातात. राजकारणी लोक संदेश पोहचविण्यासाठी याचा वापर करतात. आपत्तीच्या प्रसंगी सरकार देखील अशा मेसेजचा वापर करते. तसेच, कॉर्पोरेट कंपन्या उत्पादनाची अथवा सेवेची माहिती देण्यासाठी याचा वापर करतात. डिजिटल फसवणूक करणारे अशा रोबो अथवा स्पॅम कॉलच्या माध्यमातून फसवणूक करताना दिसतात. कधी लॉटरी लागल्याचे सांगून, कधी बँक खात्याचे केवायसी अपडेट करायचे आहे, शेअरमधून परताव्याचे आमिष दाखविले जाते. अशा कॉलना भुलून बँक खाते रिकामे होण्याचा धोका असतो.

## डिजिटल इंडियाचा आयटी खर्च पाच टक्केच

### जागतिक बँका करतात महसुलाच्या ७ ते ९ टक्के खर्च

**नवी दिल्ली : युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करीत डिजिटल इंडिया झालेल्या भारताचा आयटीवरील खर्च अवघा पाच टक्के आहे. जागतिक स्तरावर ही सरासरी सात ते नऊ टक्के आहे.**





बोस्टन कन्सल्टिंग समूहाने याबाबतचा अहवाल सादर केला आहे. बँकिंग क्षेत्रातील ७५ टक्के व्यवहार आणि कर्जवितरण, २५ टक्के डिजिटल खाती २०२६ पर्यंत त्रयस्थांमार्फत उघडली जातील. याचाच अर्थ बँकिंग सेवा बऱ्यापैकी आउटसोर्स होईल. भारतीय बँकांचा ८० टक्के आयटी खर्च केवळ बँक संचालित करण्यावर होतो. जागातील इतर बँकांच्या तुलनेत भारतीय बँका आयटीची मूळ प्रणाली सुधारण्यावर फार कमी भर देतात. त्यामुळे कामकाजात फारशी लवचिकता राहत नाही.


जगातील इतर देशांतील मोठ्या बँका ज्या दहा अब्ज डॉलरचा महसूल मिळवतात, त्या त्यांच्या महसुलातील ९.१ टक्के रक्कम आयटीच्या पायाभूत सुविधांवर खर्च करतात. तर, त्यातुलनेत भारतीय बँक ३.२ टक्के रक्कम खर्च करतात. जगातील ज्या बँकांचा महसूल १ ते १० अब्ज डॉलरवर आहे, त्या बँका आयटीवर ७.२ टक्के रक्कम खर्च करतात. त्याउलट भारतीय बँका अवघी तीन टक्के रक्कम आयटीवर खर्च करीत आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेकडे (आरबीआय) २०२२ आणि २०२३च्या आर्थिक वर्षात मोबाईल आणि इंटरनेट बँकिंगसंदर्भातील ४० हजारांहून अधिक तक्रारी दाखल झाल्या होत्या. बोस्टनच्या अहवालानुसार ग्राहकाचा चांगला अनुभव घेता यावा, अनेक सेवा एकाच छताखाली मिळाव्यात, यावर भारतीय बँका अधिक भर देत आहेत. आयटी सेवेचा जो गाभा आहे त्यावर दुर्लक्ष केले जात आहे. व्यवहार वाढताना दिसत असले, तरी पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचेही त्यानिमित्त समोर आले आहे.

देशात यूपीआय व्यवहारांची संख्या वेगाने वाढत आहे. आर्थिक वर्ष २०१८ मध्ये यूपीआयद्वारे होणाऱ्या किरकोळ व्यवहारांचे प्रमाण अवघे सहा टक्के होते. त्यात आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ८० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. तर, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये हे प्रमाण ९० टक्के होईल.

वित्तीय संस्थांना कर्जवितरणासाठी सुपर अॅप विकसित करण्यास सुरुवात केली आहे. नव्या अवतारातील अॅपचा वापर वाढत आहे. याचा ताण मूळ प्रणालीवर पडत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

## शेअर निर्देशांकाची कोसळधार



▪ सेन्सेक्स ८८६, निफ्टी २९३ अंकांनी आपटला

▪ गुंतवणूकदारांनी गमावले ४.५६ लाख कोटी

**मुंबई :** अमेरिकेच्या विकासदर वाढीबाबत वॉल स्ट्रीटला असलेली चिंता, आशियाई देशांमधील शेअर बाजारात असलेल्या निरुत्साहाचे पडसाद भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी उमटले. सेन्सेक्स तब्बल ८८६ आणि निफ्टी २९३ अंकांनी कोसळला. आयटी, ऑटो आणि ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांची शेअर विक्री वाढल्याने बाजार कोसळला. सेन्सेक्स कोसळल्याने गुंतवणूकदारांचे ४.५६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

मुंबई शेअर बाजारात (बीएसई) सेन्सेक्स १.०८ टक्क्यांनी कोसळून ८०,९८२ अंकांवर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) निफ्टी १.१७ टक्क्यांनी कोसळून २४,७१८ अंकांवर आला. सेन्सेक्स कोसळल्याने बीएसईतील गुंतवणूकदारांनी एकाच दिवसात ४.५६ लाख कोटी रुपये गमावले. त्यामुळे बीएसईतील कंपन्यांचे भांडवली मूल्य घटून ४५७.०६ लाख कोटी रुपयांवर आले.

### यूएस मार्केटचा परिणाम

अमेरिकेतील उत्पादन क्षेत्राच्या वाढीचा वेग मंदावला असल्याची आकडेवारी समोर आली. त्यामुळे अमेरिकेच्या अर्थगतीबाबत शंका उपस्थित झाल्या आहेत. परिणामी, अमेरिकन शेअर बाजार नॅसडॅक २.७६ टक्क्यांनी कोसळून १७,११४ अंकांवर आला. जपान आणि चीनच्या शेअर बाजारातही घट झाली. पाठोपाठ भारतातही त्याचे पडसाद उमटले.

## इंटर्नशिप रोजगारक्षम आहे का?

### अर्थशास्त्रज्ञ रूपा रेगे-नित्सुरे यांचा सवाल



रूपा रेगे-नित्सुरे

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटायझेशनमुळे रोजगारनिर्मितीवर परिणाम होत आहे. सरकारने इंटर्नशिपच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करण्याचा दावा केला आहे. मात्र, त्यामुळे खरेच शाश्वत रोजगारनिर्मिती होणार की हा केवळ तात्पुरता उपाय आहे, हे पाहण्याची गरज असल्याचे मत एल अँड टी फायनान्सच्या माजी मुख्य अर्थशास्त्रज्ञ डॉ. रूपा रेगे-नित्सुरे यांनी व्यक्त केले.


गोखले इन्सटिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स आणि पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे आयोजित अर्थसंकल्पावरील चर्चेत त्या बोलत होत्या. गोखले इन्स्टिट्यूटचे कुलगुरू डॉ. अजित रानडे, आयसीएसआरचे कौन्सिल सदस्य प्रा. प्रदीप आपटे, एनआयबीएमचे प्रा. डॉ. संजय बसू, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबने, प्रा. के. एस. हरी या वेळी उपस्थित होते.

महागाई रोखण्यात यशस्वी ठरल्याबद्दल त्यांनी सरकार आणि रिझर्व्ह बँकेचे कौतुक करून डॉ. रेगे म्हणाल्या, सरकारने रोजगार आधारित प्रोत्साहन योजना (इंटर्नशिप) लागू केली आहे. अशा योजनेमधून खरंच शाश्वत पद्धतीने रोजगारनिर्मिती शक्य आहे का? की, हे केवळ तात्पुरता उपाय असेल, याचा विचार केला पाहिजे.

''एका बाजूने हा अर्थसंकल्प अर्वाथवाढीला प्रोत्साहन देणारा असून, दुसरीकडक अस्थिरतेच्या वातावरणात आपल्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठीदेखील यात काही तरतुदी केल्या आहेत,'' असे प्रा. हरी म्हणाले.

मराठा चेंबरचे महासंचालक गिरबने म्हणाले, 'एमएसएमई क्षेत्राला क्रेडिट गॅप (पैशांची उपलब्धता नसणे) आणि बिझनेस डेव्हलपमेंट या आव्हानांचा सामना करावा लागेल. पत हमी योजना आणि मुद्रा कर्ज वितरण योग्य पद्धतीने राबविल्यास या अडथळ्यांवर मात करता येऊ शकेल.

## आयटीआर फायलिंगचा विक्रम!





मूल्यांकन वर्ष २०२४-२५ साठी ७.२८ कोटींवर करदात्यांनी कर विवरणपत्र (आयटीआर) दाखल केली असून हा एक विक्रम असल्याची माहिती आयकर विभागाने दिली. नवीन करदात्यांची संख्या वाढत असून ५८ लाखांहून अधिक करदात्यांनी यंदा प्रथमच आयटीआर दाखल केला आहे. याबरोबरच नवीन कररचनेचा स्वीकार करणाऱ्यांच्या संख्येतही वृद्धी होत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

**५.२७ कोटी** नवीन कररचनेला पसंती

**२.०१ कोटी** जुन्या कररचनेला पसंती

### हेही जाणून घ्या...


- आयटीआर फायलिंगमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा ७.५ टक्क्यांनी वाढ
- नवीन करदात्यांची संख्या ५८.५७ लाख
- नवी कररचना स्वीकारणाऱ्यांचे प्रमाण ७२ टक्के
- २८ टक्के करदात्यांकडून जुन्या कररचनेअंतर्गत विवरणपत्रे दाखल
- अखेरच्या दिवशी ६९.९२ लाख विवरणपत्रे दाखल
- हेल्पडेस्ककडून करदात्यांच्या १०.६४ लाख शंकांचे निरसन

### आयटीआर भरण्याकडे वाढता कल (आकडे कोटीत)

| मूल्यांकन वर्ष- | दाखल आयटीआर |
|---|---|
| २०२०-२१ | ५,७८,४५,६७८ |
| २०२१-२२ | ५,७७,३९,६८२ |
| २०२२-२३ | ५,८२,८८,६९२ |
| २०२३-२४ | ६,७७,४२,३०३ |
| २०२४-२५ | ७,२८,८०,३१८ |

### सोने (प्रति १० ग्रॅम)

| | |
|---|---|
| शुद्ध | ७०,६९०/- |
| चांदी | ८७,२००/- किलो |



### चलन विनिमय दर

| युरो | डॉलर | पौंड |
|---|---|---|
| ९०.७३ | ८३.७४ | १०६.७५ |

# लोकसंगीताने बालकांचे भावविश्व भारावले

## अ‍ॅड.शैलेश गोजमगुंडे | बीडमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा सहभाग




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड बालरंगभूमी परिषदेच्या लोककला, लोकवाद्य व लोकसंगीताच्या प्रशिक्षण व प्रदर्शनाने बालकांचे भावविश्व भारावून गेले, बालकलांतांनी लोकवाद्य व लोकसंगीताचा मनसोक्त आनंद लुटला, सुरवाद्य, तंतुवाद्य व चर्मवाद्याचे उत्कृष्ट सादरीकरण आणि प्रदर्शनाने लोककलावंतांनी बालकांसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. बीड शाखेचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. शैलेश गोजमगुंडे यांनी केले.

बीड शहरातील के.एस.के.महाविद्यालयाचे सांस्कृतिक सभागृहात लोककला, लोकसंगीत, लोकवाद्य प्रदर्शन, प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन शनिवारी (दि.३) उत्साहात झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री.गोजमगुंडे हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य दीपा क्षीरसागर होत्या. कार्यशाळेत संस्कार विद्यालय, भगवान विद्यालय, गुरुकुल इंग्लिश स्कूल, माऊली प्राथमिक शाळा, चंपावती विद्यालय, सावरकर विद्यालय, प्रगती विद्यालय, द.बा. घुमरे विद्यालय, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, सैनिकी विद्यालय, संभाजी विद्यालय, भगवान प्राथमिक शाळा, हजरत उर्दू विद्यालय बालेपिर, गीता कन्या प्रशाला तसेच ग्रामीण भागातून खांडे पारगाव हायस्कूल, तांदळेश्वर विद्यालय, जागीरमोहा स्कूल, गजानन विद्यालय राजुरी, जिल्हा परिषद शाळा राजुरी, कानडीघाट हायस्कूल कानडीघाट, हिवरापाहाडी हायस्कूल, बोरखडी विद्यालय, सरस्वती विद्यालय, कै. बाबुराव पाटील लोंढे हायस्कूल शिरूरघाट यांच्यासह वैयक्तिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता जवळपास ६०० विद्यार्थी व शिक्षक यात सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना बासरी, शंख, दिमडी, शिंग, ढोलकी, पखावज, तुंतुने, बगलबच्चा, सुंदरी, शहनाई, ताशा, ढोल, कडकणी, हलगी, गजा ढोल, टाळ, वीणा, चिपळ्या, डमरू, तुतारी, झांज, नाटी, लेझीम, एकतारी, नगारा, संबळ, तबला यासह अनेक पारंपरिक वाद्याचे शास्त्रशुद्ध माहिती व परंपरा सांगितली विद्यार्थ्यांनी हे वाद्य हाताळले पाजविण्याचा

पान २ वर...

### विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले-डॉ.दीपा क्षीरसागर

प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी मनोगतात बालरंग भूमीतर्फे महाराष्ट्रभर जल्लोष लोककलेचा हा उत्सव संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने लोककला, लोकवाद्य व लोकसंगीताचे प्रशिक्षण व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने बीड शाखेने सुरुवातीला हे प्रशिक्षण, प्रदर्शन भरवले आहे, यात शहरातील अनेक शाळा, विद्यार्थी सहभागी झाले आहेत, याचा मला खूप आनंद आहे, या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले, असे मत त्यांनी व्यक्त केले. बालरंगभूमीच्या उपक्रमाविषयी माहिती दिली.

# नाथ प्रतिष्ठानकडून विद्युत रोषणाई

## अध्यात्मिक: भाविकांसाठी फराळाचीही व्यवस्था



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येत्या सोमवारपासून पवित्र श्रावण महिन्यात सुरुवात होत असून बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथांच्या मंदिराची राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने, ना.धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्युत रोषणाईने आकर्षक सजावट करण्यात येत आहे. ठीक विद्युत रोषणाई संपूर्ण श्रावण महिना सुरू राहणार आहे.

त्याचबरोबर प्रत्येक श्रावण सोमवारी वैद्यनाथ मंदिराच्या गाभाऱ्यासह संपूर्ण मंदिरामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे २१ प्रकारचे फुले वापरून खास फुलांची आरास व सजावट देखील करण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण महिनाभर मंदिरात च्या परिसरामध्ये ओम नमः शिवाय या मंत्राचा निरंतर जाप करणारी ध्वनी प्रणाली देखील बसवण्यात येत आहे. प्रत्येक श्रावणी सोमवारी साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचे लाडू असा प्रसादही भाविकांना नाथ प्रतिष्ठानच्या वतीने वाटप करण्यात येणार असून येणाऱ्या सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन

पान २ वर...

# द ग्लॅमोवेल एक्स्ट्रावागांझाची घोषणा

## पत्रकार परिषद: डॉ. प्रचिती पुंडे यांनी दिली माहिती




पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

जीवनात ग्लॅमर आणि आरोग्य यांच्यातील समतोल राखण्याच्या महत्त्वाबद्दल समाज जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रोलक्स वेलनेस अँड प्रॉडक्शन ने प्रोलक्स गाला: द ग्लॅमोवेल एक्स्ट्रावागांझाची या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. हा संपूर्ण कार्यक्रम ९ ते २५ ऑगस्ट या दरम्यान होणार आहे. अशी माहिती प्रोलक्स प्रोडक्शनच्या संस्थापक संचालिका आणि मिसेस युनिव्हर्स टॉलरन्स डॉ.प्रचिती पुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. प्रचिती पुंडे यांनी सांगितले की, प्रोलक्स ही एक जीवनशैली असून एक बहु-अनुभव केंद्र जे जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये यशस्वी होण्यासाठी काय आवश्यक आहे ते प्रदान करते. या कार्यक्रमा अंतर्गत ग्लॅमवेल वेलनेस अवेअरनेस रॅली काढण्यात येणार आहे. सहा दिवस चालणार्या हा कार्यक्रम ९ ते १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत शहरातील विविध ठिकाणी असेल. १६-१८ ऑगस्ट रोजी प्रोलक्स प्रॉडक्शन डे साजरा करण्यात येईल. संध्याकाळी ६-८ या दरम्यान ग्लॅमोवेल रॅली आणि टिकाऊ पोशाखांसह फॅशन रॅप शो समाविष्ट आहे. तसेच २३ ते २५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत प्रोलक्स वेलनेस डे साजरा करण्यात येईल. यामध्ये वेलनेस वर्कशॉप्स, स्पा ट्रीटमेंट्स आणि इंटरएक्टिव्ह वेलनेस झोन घरात उपलब्ध असतील. ज्यामध्ये राष्ट्रीय आणि

पान २ वर...



# चिंचोली माळीत वाढदिवस उत्साहात!

## नियोजन : मनोज जरांगेंचा वाढदिवस साजरा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १ ऑगस्ट रोजी असलेल्या वाढदिवसा निमित्त चिंचोली माळी येथे छत्रपती शिवाजी महाराज राजमुद्रेंचे पुंजन करुन पुष्पहार अर्पण छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदना करून डीजेच्या जल्लोषात संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरी करण्यात आला यावेळी उपस्थित निष्ठावंत शिवसैनिक लक्ष्मीमन तात्या गलांडे , जेष्ठ समाजसेवक गौतम बापु गलांडे,दत्ता गलांडे,मुन्ना नखाते, राजाभाऊ मोटे,माजी सरपंच सुनील

पान २ वर...

# परळीत नेत्रदिपक दिंडी सोहळा

## धार्मिक : संत सावता महाराजांचा समाधी सोहळा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

संतश्रेष्ठ सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात मागील सात दिवसापासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु असुन शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी समाधी सोहळ्यानिमीत्त संत सावता महाराजांच्या पालखी सोहळ्याने परळी नगरीची नगर प्रदक्षिणा केली.संतांचे अभंग,भगव्या पताका घेतलेले भाविक,डोक्यावर मंगलकलश घेतलेल्या हजारो महिला भाविकांचा सहभाग असलेला चार तासांच्या नगर प्रदक्षिणेनंतर पाच वाजता सावतामाळी मंदिरात पोंहचल्यानंतर महाप्रसादाने सांगता झाली.

संतश्रेष्ठ सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी परळी येथील संत सावतामाळी मंदिरात रविवार दि.२८ जुलै पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.या सप्ताहाची रविवार दि.४ ऑगस्ट रोजी सांगता होणार आहे.सप्ताहात धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी परळीतील सावतामाळी मंदिर येथुन दुपारी १ वाजता पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या शेकडो महिला,अभंगाच्या चालीवर पाऊले खेळणारे महिला भजनी मंडळ,लेझीमच्या तालावर

पान २ वर...



# मुलाने माय-बापाचे नाव कमावले

## सक्सेस : अंकुश साळवे पोलीस कॉन्स्टेबलपदी

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी येथील भीम पुत्र अंकुश सुरेश साळवे यांची पोलीस कॉन्स्टेबल पदी निवड झाली अंकुश साळवे हे राहुरी राजवाडा येथील रहिवासी आहेत अत्यंत मेहनतीने व जिद्दीनं त्यांनी हे यश प्राप्त केले आहेअतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी खडतर प्रयत्नाने एस आर पी एफ गट नंबर ७दौड या ठिकाणी अनुसूचित जाती प्रवर्गातून १५वा नंबर मिळवला आहे

अंकुश साळवे यांची पोलीस कॉन्स्टेबल पदी निवड होताच त्यांची राहुरी राजवाडा येथे मिरवणूक काढण्यात आली अंकुश साळवे यांचे मोठे बंधू अजय साळवे हे महसूल विभागात तलाठी पदावर कार्यरत आहे सामाजिक व धार्मिक कार्यात दोन्ही बंधु अग्रेसर असतात अंकुश साळवे यांच्या निवडीची सर्वच स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे लवकरच आंबेडकरी चळवळीच्या वतीने साळवे यांचा भव्य सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे

# संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा

## अध्यात्मिक : शिंपी समाज बांधव उपस्थित



वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भागवत धर्माचे शिरोमणी आद्य प्रचारक तथा अध्यात्माचे व परमार्थाचे मुकूटमणी शिंपी समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री.नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजिवन समाधी सोहळा वडवणी शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संत नामदेव महाराजांना अभिवादन करण्यासाठी समस्त शिंपी समाज बांधव उपस्थित होते.

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी संत शिरोमणी श्री.नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजिवन समाधी सोहळा शुक्रवार दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी संत श्री.नामदेव महाराज मंदिर,वडवणी याठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळची महापूजा, अभिषेक त्यानंतर संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत टाळ, मृदंगाच्या साथीने सर्व समाजबांधव व वारकरी संप्रदायाचे असंख्य भाविक भक्त यात सहभागी झाले होते. फटाक्यांची आतिषबाजी व संत नामदेव महाराजांचा जयघोष याने यावेळी संपूर्ण आसमंत

पान २ वर...

# शासन स्तरावर कार्यवाहीला सुरवात

## योजना : नोंदणी करण्याचे तहसीलदार देशपांडेंचे आवाहन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू झाल्यापासून राज्यातील शिकलेल्या पोरांसाठी देखील योजना आणण्याचे सरकारने घोषणा केली होती. लाडकी बहिण नंतर आता लाडका भाऊ हि देखील योजना आपण सुरू करणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले होते.त्यानुसार आता शासनस्तरावर कार्यवाही सुरू झाली आहे. लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. याबाबतचा जीआर देखील काढण्यात आला असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. केज तहसील कार्यालयात देखील काल मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना बाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सुशिक्षित युवकांनी नोंदणी करण्याचे आवाहन तहसीलदार सचिन देशपांडे यांनी केले आहे.

## पडघम | डॉ.महेश थोरवे उतरणार मैदानात

# आष्टीत नव्या चेहऱ्यामुळे कलाटणी!



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीची सर्वच राजकीय पक्षांना चाहूल लागली असतानाच, राष्ट्रवादी (शरद पवार गट ) या पक्षाकडून नवीन चेहऱ्याला संधी मिळणार असल्यामुळे बहुचर्चित आष्टी मतदार संघाच्या राजकारणाला आता मोठी कलाटणी मिळण्याची शक्यता असून या निवडणुकीच्या आखाड्यात समाजातील प्रश्नांची जाण डोळ्यासमोर ठेवून राजकीय समीकरणे बदलण्याची धमक असणारा उच्चशिक्षित नवीन चेहरा म्हणून डॉक्टर महेश थोरवे हे राष्ट्रवादीची तुतारी हातात घेऊन प्रस्थापित नेत्यांसमोर विधानसभेच्या मैदानात उतरणार आहे. त्यामुळे आगामी विधानसभेची लढत मोठी रंजक व रोमांचक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकारण हा माझा पिंड नाही, मात्र परिवर्तनाची तळमळ आणि चांगुलपणा घेऊन आपण आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याचे डॉ. थोरवे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले सांगितले.

आष्टी, पाटोदा, शिरूर या राजकीयदृष्ट्या बहुचर्चित मतदार संघांमध्ये आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राजकीय पक्षांच्या हालचालींना मोठा वेग आला आहे. प्रत्येक

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व औद्योगिक अशा विविध क्षेत्रात भरीव कामगिरी असणारे व्यक्तिमत्व म्हणून डॉ. महेश थोरवेंची ओळख आहे. आष्टीच्या आखाड्यात आता लोकप्रतिनिधी म्हणून हा परिवर्तनाला पर्याय चेहरा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मतदार संघात हे उच्चशिक्षित उमदे व्यक्तिमत्व म्हणून रिंगणात असू शकतात. राजकीय विरोधकांना दखल घ्यायला भाग पाडेल. असा हा चेहरा किती आश्वासक ठरू शकतो, मतदारांची पसंती, किती विश्वासाने पूर्ण होईल. आणि डॉ. थोरवेंच्या गळ्यात मोठ्या पवार साहेबांकडून उमेदवारीची माळ पडेल का, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# केजमध्ये रानडुक्करे घालताहेत धुमाकूळ !

## नुकसान : शेतकऱ्यांच्या ऊसाची लावली वाट



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिंदी परिसरात रानडुक्कराच्या कळपाने ऊसाचे नुकसान केले आहे .शिंदी परिसरात व तालुक्यातील रानडुक्करांनी धुमाकूळ घातला आहे तरी वनविभागाने व प्रशासना कडुन बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात येत आहे केज तालुक्यातील शिंदी येथील परिसरात दहा ते बारा रानडुक्करांच्या कळपाने धुमाकूळ घातला असून डुक्करे हातातोंडाशी आलेला ऊस फस्त करत आहेत. सुमारे दोन तीन एकरातील उसाचे डुक्कराच्या कळपाने नुकसान केले आहे. नुकसानीचा पंचनामा करून नुकसानभरपाई मिळावी तसेच वनविभागाने या रानडुक्करांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.शिंदी गावातील सर्वी नंबर २९७ शेतात गेल्या काही दिवसांपासून दहा ते बारा रानडुक्करांच्या कळपाचा वावर आहे. हा कळप रात्रीच्या वेळी या परिसरातील ऊस फस्त करत आहेत. डुक्करे ऊस निम्म्यातून चघळून टाकतात. यामुळे सुमारे दोन तीन एकर क्षेत्रातील अनेक शेतकऱ्यांच्या उसाचे नुकसान झाले असून त्यांना

पान २ वर...